अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com मंगळवार दि. १३ डिसेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ७७ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## भारत-चीनच्या सैनिकांमध्ये पुन्हा झटापट; अनेक सैनिक जखमी



नवी दिल्ली : अरुणाचल प्रदेशमध्ये भारत आणि चीनच्या सैनिकांमध्ये पुन्हा एकदा झटापट झाल्याची माहिती समोर आली आहे. ९ डिसेंबर रोजी दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये ही झटापट झाली असल्याची माहिती आहे.

याशिवाय झटापटीत दोन्ही देशांचे मिळून जवळपास ३० पेक्षा अधिक सैनिक जखमी झाल्याचीही माहिती समोर आली आहे. तवांग जवळ ही झटापट झाली आहे. याबाबत भारतीय लष्कराकडून अधिकृतरित्या माहिती अद्याप बाहेर आलेली नाही. एएनआयने याबाबत वृत्त दिले आहे. या झटापटीनंतर दोन्ही देशांमध्ये कमांडरस्तरीय चर्चा झाली होती. यानंतर दोन्ही देशाचे सैनिक मागे हटले होते. ऑक्टोबर २०२१मध्ये अरुणाचलमधील यांगसेमध्येही दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये वाद उफाळला होता. तवांग जिल्ह्यातील यंगस्तेमध्ये ही झटपाट झाली. प्राप्त माहितीनुसार चीन पीपुल्स लिब्रेशन आर्मी L-C पर्यंत पोहचली होती. त्यांनतर भारती जवानांनी त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले.

# आईचा जन्म संपवणाऱ्या मुलाला झाली जन्मठेप



सुराज्य/सोलापूर

**वडील वारलेले... मोठा भाऊसुध्दा मरण पावलेला... आई आणि मुलगा दोघेच राहिलेले... त्यात मुलाला लागले जुगाराचे व्यसन. जुगार खेळण्यासाठी आईने पैसे दिले नाहीत म्हणून रागाच्या भरात मुलाने आईच्या डोक्यात लोखंडी फुकारीने एकामागून एक वार केले. त्यात आई रक्ताच्या थारोळ्यात पडली आणि तिथेच मरण पावली. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये जन्मदात्या आईचा जन्म संपवणाऱ्या मुलाला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश मिलिंद भोसले यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली.**



वंदना कोळेकर (मयत आई)



अतुल कोळेकर (आरोपी मुलगा)

**वडिलांच्या निधनानंतर आईनेच केला होता सांभाळ; १६ महिन्यात लागला निकाल**

अतुल एकनाथ कोळेकर (रा.मित्रनगर, परमशेट्टी मिलमागे) असे जन्मठेपेची शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव असून त्याने वंदना एकनाथ कोळेकर (वय ४८) हिचा दि.२३ ऑगस्ट २०२१ रोजी पहाटे लोखंडी फुकारीने खून केला होता. घटनेच्या दिवशी म्हणजे दि.२२ ऑगस्ट २०२१ रोजी अतुलने आईकडे जुगार खेळण्यासाठी पैसे मागितले. मात्र आई वंदनाने पैसे देण्यास नकार दर्शवला. त्यामुळे रागाच्या भरात अतुलने आई वंदना यांचा लोखंडी फुकारीचा घाव घालून खून केला होता. या खटल्यात सरकारतर्फे ॲड.गंगाधर रामपुरे आणि आरोपीतर्फे ॲड. सुरेश चव्हाण यांनी काम पाहिले.

अतुल लहान असतानाच त्याचे वडील एकनाथ यांचे निधन झाले होते. त्याच्या भावाचाही २०१९ मध्ये मृत्यू झाला होता. वडिलांच्या पश्चात आई वंदना कोळेकर (वय-४८) यांनी दोन्ही मुलांचा सांभाळ केला होता. एका मुलाच्या मृत्यूनंतर एकटीच्या कमाईतून कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू होता. अतूल सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत हमाली करीत होता. परंतु, त्याच्या डोक्यावर परिणाम झाला होता आणि त्याला अधूनमधून फिट्स येत होते. त्याच्यावर औषधोपचार सुरू होते.

कर्नाटकातील एका मुलीशी त्याचा विवाह झाला होता. मात्र, अतुलच्या त्रासाला कंटाळून ती माहेरी गेली होती. त्यानंतर त्याला दारू आणि जुगाराचे व्यसन लागले होते. त्यामुळे अतुल आईकडे वारंवार जुगारासाठी पैशांची मागणी करत होता. यातून त्याचे आणि त्याच्या आईचे रोज भांडण होत होते. घटनेच्याव दिवशीही असाच प्रकार घडला. त्याने आईकडे जुगार खेळण्यासाठी पैसे मागितले. मात्र वंदना यांनी त्यास नकार दिला. त्यामुळे रागाच्या भरात अतुलने आई वंदना यांचा लोखंडी फुकारीचा घाव घालून खून केला होता.

### • रक्ताच्या थारोळ्यातील आईवर केले वार

दि. २२ ऑगस्ट २०२१ रोजी रात्री दहाच्या सुमारास वंदना कोळेकर यांच्या घरातील भाडेकरू राजकुमार गुलाब कलावंत हे घरात टीव्ही पहात झोपी गेले होते. त्यावेळी कोळेकर यांच्या घरात भांडणे सुरू होती. मात्र हा नेहमीचाच प्रकार असल्याने कलावंत यांनी दुर्लक्ष केले. परंतु पहाटे दीडच्या सुमारास घरमालकीण वंदना कोळेकर यांनी 'भाऊ भाऊ' म्हणून भाडेकरू राजकुमार कलावंत यांना आवाज दिला. आवाज ऐकून ते खाली आले आणि पाहिले असता त्यावेळी अतुल हा आईच्या डोक्यावर लोखंडी फुकारीने वार करीत होता. रक्तस्राव होत असतानाही त्याने मारहाण सुरूच ठेवली.

### • भाडेकरूच्या घराला लावली बाहेरून कडी

भाडेकरू राजकुमार कलावंत यांनी यांनी अतुल याला तू आईला का मारतो, अशी विचारणा केली.त्यावेळी अतुल म्हणाला,तू मध्यस्थी करू नकोस,नाहीतर तुलाही मारून टाकेन. त्यामुळे राजकुमार कलावंत घाबरून तिथून निघून गेले. त्यानंतर आरोपी अतुलने कलावंत राहत असलेल्या घराला बाहेरून कडी लावली. याप्रकरणी कलावंत यांनीच २३ ऑगस्ट २०२१ रोजी जोडभावीपेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

### • हातपाय धुऊन गेला निघून

स्वत:च्या आईचा खून केल्यावर अतुलच्या चेहऱ्यावर कोणतेही हावभाव नव्हते. त्याला पश्चातापही झाला नव्हता. खुनानंतर अतुल हातपाय धुऊन घराबाहेर पडला. तो शेळगीजवळच्या शेतकी फार्मवर लपून बसला होता. तेथून पोलिसांना त्याला ताब्यात घेतले होते. तेव्हापासून तो न्यायालयीन कोठडीतच होता. त्याला जामीन मिळाला नव्हता. कोर्टाने त्याला न्यायालयीन कोठडीत ठेवूनच खटला चालवला.

## ८ गाळ्यांसह बेगम कमरुनिस्सा कारीगर स्कूल सील

**महापालिकेच्या वसुली पथकाची कारवाई सुरूच**

सुराज्य/सोलापूर





महापालिकेच्या कर संकलन विभागाच्या विशेष वसुली पथकाची सील ठोक कारवाई सुरूच असून सोमवारी एका थकबाकीदाराचे आठ गाळे तर बेगम कमरुनिस्सा कारीगर स्कूलच्या प्राचार्य रूमसह संगणक लॅब सील केले आहे. सोमवारी एकाच दिवशी विशेष वसुली पथकामार्फत १ कोटी ५ लाख रुपये कर वसुली करण्यात आली आहे.

सोमवारी विशेष वसुली पथकाने शहरातील बड्या थकबाकीदारांविरोधात कारवाई केली आहे. निगप्पा गुरुपादप्पा गवसणे यांच्याकडील ५ लाख १७ हजार ७४० मिळकतकर थकबाकी पोटी ८ व्यावसायिक गाळे सील केले आहेत.

बेगम कमरुनिस्सा कारीगर स्कूलच्या ५४ लाख ४७ हजार २२ रुपये थकबाकीपोटी संगणक लॅब, प्राचार्य रूम व लायब्ररी सिल करण्यात आले आहे. नोटिसा बजावण्यात आलेल्या सहा थकबाकीदारांनी सील कारवाई टाळण्यासाठी थकबाकी भरली आहे. यामध्ये नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड स्कूल - ५ लाख ६३ हजार ९७७ रुपये, नागनाथ व्यंकप्पा घोडके - ९९ हजार ४८० रुपये, बी.सी. लोंढे - १ लाख २० हजार ३२३ रुपये, शिरीष चंदुमल मेहता - ९४ हजार ७३३ रुपये , सतीश कनकुरे - ४५ हजार ८३४ रुपये, मराठा समाज सुधारक मंडळ, छत्रपती प्रशालने ४ लाख १० हजार १०३ रुपये थकबाकी भरली आहे. वसुली पथकामार्फत सोमवारी धनादेशाद्वारे एकूण १३ लाख ३४ हजार ४५० रुपये थकबाकी वसुली केली आहे तर दैनंदिन कर वसुली ९२ लाख ४७ हजार ९७८ रुपये झाली आहे.असे दोन्ही मिळून एकूण १ कोटी ५ लाख ८२ हजार ४२८ रुपये मिळकतकर थकबाकी महापालिका तिजोरीत जमा झाली आहे, अशी माहिती महापालिका कर संकलन विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांनी दिली. कटू कारवाई टाळण्यासाठी मिळकतदारांनी आपली थकबाकी भरावी, असे आवाहन महापालिका उपायुक्त विद्या पोळ यांनी केले आहे.

## पंढरपूर नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यास मारहाण

सुराज्य/सोलापूर



पंढरपूर नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यास शिवीगाळ करून फरशीने जखमी केल्याप्रकरणी तरुणाविरोधात विरुद्ध शासकीय कामात अडथळा आणण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी महावीर नगर येथील सुनील चौगुले याच्या विरोधात नगरपरिषदेचे कर्मचारी रमेश हनुमंत पवार यांनी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

घटनेची अधिक माहिती अशी की, रमेश पवार यांच्यावर पालिकेतील सफाई कामगारावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी आहे. पवार यांच्याकडे सफाई कामगार अंकुश अरुण धनवजीर यांनी सुनील चौगुले हा कचरा उचलण्यावरून वेळोवेळी शिवीगाळ व त्रास देत असल्याबाबत तक्रार केली होती. याची दखल घेऊन पवार यांनी सुनील चौगुले यांच्या घरी जाऊन त्याच्या आईस सफाई कामगारा बाबत काही तक्रार असल्यास मला किंवा नगरपालिकेत सांगा पण त्यांना शिवीगाळ करू नका असे सांगितले होते. या घटनेनंतर शनिवारी १० रोजी सकाळी सात वाजता रमेश पवार हे नेहमीप्रमाणे सफाई कामगारांची माहिती घेण्यासाठी फिरत असताना महावीर बागेजवळ सुनील चौगुले हा आला व त्याने तू माझ्या घरी जाऊन आई कडे तक्रार का केली असे म्हणून शिव्या देऊ लागला.

पवार यांनी शिव्या देऊ नको असे म्हणताच संतापलेल्या चौगुले यांनी त्यांना लाथा बुक्क्याने मारहाण केली तसेच जवळच पडलेला फरशीचा तुकडा उचलून कानावर मारला. यामुळे ते जबर जखमी झाले आहेत. याप्रकरणी सुनील चौगुले याच्यावर शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुख्यमंत्री शिंदे-बोम्मई यांची भेट

सुराज्य/अहमदाबाद



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्यात अहमदाबादच्या विमानतळावर सोमवारी भेट झाली. विशेष म्हणजे या भेटीवेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील तिथे उपस्थित होते.

सध्या सुरू असलेल्या सीमावादाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यात सध्या सुरू असलेल्या सीमावादादरम्यान सोमवारी पहिल्यांदाच शिंदे-फडणवीस आणि बोम्मई यांची भेट झाली आहे. गुजरातचे नवे मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल यांच्या शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई उपस्थित होते. शपथविधीनंतर आपआपल्या राज्यात परत जात असताना शिंदे, फडणवीस आणि बोम्मई यांची विमानतळाच्या विशेष कक्षात भेट झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सोलापूर आणि सांगलीतील अनेक गावांवर दावा केलाय. विशेष म्हणजे काही गावे स्वत:हून कर्नाटकात जाण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे. सीमावादाचा विषय सध्या न्यायप्रविष्ट आहे. सुप्रीम कोर्टात याबाबत सुनावणी सुरू आहे. असे असताना कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी हा वाद पुन्हा उरकून काढला आहे. या सगळ्या घडामोडींदरम्यान दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची सोमवारी झालेली प्रत्यक्ष भेट ही महत्त्वाची मानली जात आहे.



सोलापूर जिल्हा परिषदेसमोर करण्यात आलेले प्रति विधानसभा आंदोलन लक्षवेधी ठरले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



ते गेले भूर्कन... आता कुणाला समस्या सांगायच्या?

| कल्याण |
| --- |
| ----- |

| मेन बाजार |
| --- |
| ----- |

# प्रांताधिकारी निकम यांच्या भ्रष्ट कामाच्या चौकशीसाठी समिती सोलापुरात

- पुरवठा विभागाचे उपायुक्त डॉ.कुलकर्णी, राजापूरकर, चौगुले, साळुंखेंची समिती
- १४ ते १६ डिसेंबर दरम्यान होणार कार्यालयाची तपासणी

सुराज्य/सोलापूर

सोलापूर उपविभागीय क्रमांक एकचे अधिकारी हेमंत निकम यांच्या भ्रष्ट कामाविषयी अनेक तक्रारी शासन पातळीवर दाखल झाल्या आहेत. याकामाची विभागीय आयुक्तांकडून चौकशी आहे. या तक्रारींची दखल घेऊन विभागीय आयुक्तांनी पुरवठा विभागाचे उपायुक्त डॉ.त्रिगुण कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली सातारा येथील उपजिल्हाधिकारी संगीता राजापूरकर - चौगुले, सह जिल्हा पुरवठा अधिकारी विवेक साळुंखे यांची नियुक्ती केली असून १४ ते१६ डिसेंबर तीन दिवस निकम यांच्या कार्यालयाची झाडाझडती घेत तपासणी केली जाणार आहे. निकम यांच्या गैर कामांविषयी अनेक प्रकरणे चव्हाट्यावर आली आहेत. याबाबत विभागीय आयुक्त, केंद्रशासन, राज्यशासन आणि सीबीआयकडे तक्रारी दाखल आहेत. माजी मंत्री ॲड. दिलीप सोपल, सोलापूरचे सामाजिक कार्यकर्ते संदीप शितोळे, जयराज नागणसुरे यांनी तक्रारी करत निकम यांच्या कामाची चौकशी करण्याची मागणी केली होती. या तक्रारींची दखल घेऊन तीन जणांच्या समितीची नियुक्ती केली आणि पुरवठा विभागाचे उपायुक्त डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती सोलापुरात १४ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता



जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होणार आहे. सलग तीन दिवस निकम यांच्या कार्यालयाची तपासणी केली जाणार आहे. तसे पत्र तपासणी अधिकारी आणि तक्रारदार तसेच निकम यांना प्राप्त झाल्याचे सांगण्यात येते.निकम यांनी त्यांच्या कार्यकाळात सर्व महसुली कामांच्या सर्व संचिका तपासणीसाठी उपलब्ध करून देण्याच्या सूचना तपासणी पथकाच्या अध्यक्षांनी दिल्या आहेत.

### ■ काय आहे नेमके प्रकरण

पदावर नसताना राष्ट्रीय महामार्गासाठी रस्त्याच्या कामासाठी लागणाऱ्या जमिनीचा बोगस निवाडा देऊन तब्बल सात कोटींचा अपहार केल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते संदीप शितोळे यांनी केंद्रशासन आणि राज्य शासनाच्या सीबीआयकडे केली आहे. प्रकरणाची चौकशी करून शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

### ■ निवाडा बदलण्याचा अधिकार कोर्टास

भूसंपादन केलेल्या जागेचा निवाडा झाल्यानंतर त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार न्यायालयास आहे. निकम यांनी आपल्या पदाचा गैरवापर करत पदावर नसताना कागदपत्रामध्ये फेरफार करत निवाडामध्ये बदल करत शासनाची फसवणूक केली. या प्रकरणात फसवणुकीचा गुन्हा दाखल करत निकम यांची चौकशी करण्याची मागणी आहे. याबाबतचे सर्व पुरावे दाखल केले आहेत. चौकशी समितीपुढे पुन्हा हे पुरावे सादर केले जातील, असे तक्रारदार संदीप शितोळे यांनी सांगितले.

### ■ जिल्हाधिकाऱ्यांकडून दोन वेळा तपासणी

निकम यांच्या कार्यालयाची जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दोन वेळा तपासणी केली आहे. काही कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत. निकम यांना सक्तीच्या रजेवर जाण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते. आता या तपासणी पथकाच्या माध्यमातून काय सिध्द होते हे पाहावे लागणार आहे.

# जळगावचा घोडेबाजार

राज्यात फळबागांचे माहेरघर असलेल्या जळगाव जिल्ह्याच्या राजकारणात अनेक बडे प्रस्थ आहेत. एकेकाळी काँग्रेसमध्ये व त्यानंतर शरद पवारांशी निष्ठा ठेवलेले सुरेशदादा जैन यांचे नाव कुणाला माहीत नाही, असे होऊ शकेल काय? राज्यात सत्तांतर झाले की-जिल्हास्तरावरील राजकिय क्षेत्रातील घरांचे वासे आपोआप फिरायला लागतात. महाविकास आघाडीच्या सत्तेत भाजपला कंटाळून राष्ट्रवादीत गेलेले एकनाथ खडसे यांचा तिथे वट होता परंतु ते सरकार कोसळून शिंदे-फडणवीस गटाची सत्ता आल्यानंतर खडसे आडवे झाले आणि गिरीश महाजन हे पुन्हा उभे राहिले. हे दोघेही तिथले धनवान राजकारणी.आमदारकी आणि विविध संस्थांवरील वर्चस्वामुळे दोघांमध्ये आडवे विस्तव जात नाही.काही दिवसांपूर्वी दोघांमधले आरोप-प्रत्यारोप ऐकल्यानंतर मराठी माणसाला कानावर हात ठेवावे लागले होते. जळगाव जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या निवडणुकीत खडसे यांना जबर धक्का बसला. निवडणुकीच्या निकालातून सामाजिक गणितेही प्रभावी ठरली. भाजप-शिंदे गटप्रणीत शेतकरी विकास पॅनलच्या ताब्यात संघ गेला असला तरी त्यातही निम्मे उमेदवार राष्ट्रवादीचे आहेत. त्यामुळे या निकालाकडे पक्षीयदृष्ट्या पाहिल्यास फसगत होण्याचीच शक्यता अधिक. असे असले तरी शिंदे गटाचे पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि भाजपचे मंत्री गिरीश महाजन हे या विजयाचा राजकिय लाभ उठविण्याचा नक्कीच प्रयत्न करतील. सुमारे ५०० कोटींची उलाढाल असणाऱ्या दूध संघात भाजप-शिंदे गटप्रणीत शेतकरी विकास पॅनलने २० पैकी १६ जागा ताब्यात घेऊन खडसे यांच्या सहकार पॅनलचा धुव्वा उडवला.



२०१५ मध्ये आमदार खडसे हे भाजपमध्ये होते, त्यावेळी त्यांनी सर्वपक्षीय पॅनलचा प्रस्ताव सादर करीत दूध संघात वर्चस्व मिळवीत, कन्या ॲड. रोहिणी खडसे-खेवलकर यांच्या रूपाने जिल्हा बँकही ताब्यात घेतली होती. भोसरी खुल्या भूखंड प्रकरणात आरोप झाल्यानंतर खडसेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. नंतर खडसेंनी भाजपला रामराम करीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. परिणामी जिल्ह्यातील सत्तासमीकरणेही बदलली. त्यानंतर राज्यातील सत्तांतरनाट्य घडल्याने जिल्ह्यातील गुलाबराव पाटील, गिरीश महाजन विरुद्ध एकनाथ खडसे या राजकिय शत्रुत्वास अधिकच धार चढली. राज्यात सत्तांतर नाट्यानंतर दूध संघात शासनाच्या आदेशाने प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आले. शासनाने प्रशासक प्रमुख म्हणून भाजपचे चाळीसगावचे आमदार चव्हाण यांची नियुक्ती केली. त्यांनी प्रशासकपदाच्या ३२ दिवसांत दूध संघातील सात वर्षांतील मंदाकिनी खडसे यांच्या कार्यकाळातील नोकरभरतीसह गैरकारभार आणि गैरव्यवहाराची प्रकरणे उघडकीस आणली. या प्रकरणात खडसेंचे निकटवर्तीय असलेल्या कार्यकारी संचालकांसह चार अधिकाऱ्यांना अटकही झाली. हा खडसेंसाठी पहिला धक्का होता. दूध उत्पादकांनी शेतकरी विकास पॅनलच्या बाजूने कौल देत खडसेंवरील नाराजी व्यक्त केली. थेट खडसेंना आव्हान देत पराभव करण्याची क्षमता पहिल्यांदाच चव्हाणांनी दाखविली. त्यामुळे भाजप अंतर्गत चव्हाण यांचे वजन नक्कीच वाढले. त्यांच्या विजयात दोन्ही मंत्र्यांचे मोठे योगदान आहेच. दोन्ही मंत्र्यांचे चातुर्य, सत्तेचा प्रभाव शेतकरी विकास पॅनलच्या कामी आला. आजपर्यंत सहकार क्षेत्रात प्रवेश न केलेले मंत्री गुलाबराव पाटील यांनी दूध संघात जळगाव मतदारसंघातून दणदणीत विजय मिळवीत दिमाखदार प्रवेश केला. दूध संघाच्या निवडणुकीत सहकार पॅनलच्या उमेदवारांसह मंदाकिनी खडसे यांना निवडून आणणे, हेच खडसेंसमोर मोठे आव्हान होते. खडसेंच्या विरोधात दोन मंत्री, पाच आमदार आणि दोन खासदार असे दिग्गज होते. शिवाय, त्यांच्या पाठीशी सत्ताही होती. निवडणुकीत पैशांचा महापूर वाहणार, असा आरोप खडसेंनी केला आणि तसे झाल्याचीही चर्चा आहे. दोन्ही बाजूंनी खोक्यांचा वापर झाल्याचे चर्वितचर्वण चांगलेच रंगले. दूध संघातील यशामुळे जनता शिंदे-फडणवीस सरकारच्या पाठीशी असल्याचा अर्थ महाजन-पाटील यांनी काढल्यास त्यांच्यासाठी पुढील निवडणुकांमध्ये ते धोकादायक ठरू शकते. या एका निवडणुकीमुळे खडसे यांचे राजकारण संपले नसले तरी त्यांना नेमके चुकते कुठे, हा बोध देणारा हा निकाल निश्चितच आहे. सहकार क्षेत्रात राजकारण नसते. त्यामुळे माझ्यासाठी राष्ट्रवादीने दरवाजे बंद केलेले नाहीत, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भाजप-शिंदे गटप्रणीत शेतकरी विकास पॅनलमधून निवडून आलेले संजय पवार यांची प्रतिक्रिया सर्वात बोलकी आहे. आमदारकी आणि संस्था आपल्या ताब्यात राहाव्यात ही महत्त्वाकांक्षा सर्वच जिल्ह्यामध्ये दिसते. घोडेबाजार केल्याखेरीज सहकारी संस्था ताब्यात येत नाहीत, हा एक वाईट पायंडा राजकारण्यांनी पाडला आहे.

---

राजकीय

# समृद्धी महामार्गाच्या निमित्ताने!

**मुंबई आणि परिसरातील जिल्ह्यांत कोकणातील लोकांची संख्या सर्वाधिक आहे. ती किती प्रमाणात आहे याचा विशेष अनुभव गणेशोत्सवावेळी रेल्वे प्रशासन, खासगी-राज्य महामंडळाच्या बसगाड्या यांची सेवा देणाऱ्यांना आहे. असे असूनही गेली अंदाजे १२ वर्षे मुंबई-गोवा महामार्गाचे घोंगडे भिजत आहे. त्याला काही अद्याप पूर्णपणे समृद्धी आलेली नाही. मुंबई-नागपूर या ७०१ कि.मी. पैकी ५२० कि.मी.च्या नागपूर-शिर्डी या समृद्धी महामार्गाचे पंतप्रधान महोदयांनी उद्घाटन केले.**

देशातील मोठा महामार्ग म्हणून ७०१ कि.मी.च्या या महामार्गाकडे पाहिले जात आहे. मात्र मुंबई-गोवा महामार्ग का रखडला आहे? हा प्रश्न कोकणवासीयांना सतावत आहे. पावसाळ्यात या महामार्गावर प्राणघातकी खड्डे असतात. त्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावतो आणि काही ठिकाणी वाहतूक कोंडी होते. परिणामी मानसिक त्रास होतो, इंधन-वेळ वाया जातो आणि बहुतांश वेळ प्रवासातच खर्च होतो. शिवाय प्रदूषणात भर पडते ती तर दुर्लक्षितच असते. असे काय घोडे मारले आहे आम्ही की आम्हांला एक चांगला महामार्ग मिळू शकलेला नाही? या कोकणवासीयांच्या रोकड्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरितच आहे.

निसर्ग समृद्ध असे कोकण महाराष्ट्राचे नैसर्गिक सामर्थ्य, वैभव आहे. कोकणातील रत्नागिरी-सिंधुदुर्ग हे दोन्ही जिल्हे राष्ट्रीय स्तरावर स्वच्छ जिल्हे म्हणून प्रथम मान मिळवलेले जिल्हे आहेत. असे कोकण कसे दिसते? तेथील राहणीमान, दैनंदिन जीवनमान, आपुलकी, आहार, वातावरण कसे असते, आदींचा वेध घेण्यासाठी कोकणात यावेसे वाटणाऱ्या बिगर कोकणवासी लोकांची संख्या अधिक आहे. त्यामुळे आपले वाहन असेल तर कुठेही, कधीही चटकन जाता येते. हा तर पर्यटनाचा मूलभूत भाग आहे. यामुळे अधिकाधिक भाग पहाता येतो. असे असताना या मार्गाला जेवढा विलंब होत आहे. तितके आपण पर्यटनाच्या पटलावर मागे राहत आहोत. तितकाच महसूलही बुडत आहे. परिणामी बेकारी, बेरोजगारी यांना वाव मिळत आहे. निसर्गाने कोकणाला पुष्कळ दिले आहे, देत आहे. पण ते कसे घ्यायचे याचे मानवी नियोजन चोख नसल्याने आर्थिक तोटा सोसावा लागत आहे.

देशातील अनेक जण पर्यटनासाठी केरळ राज्यात जातात. ठीक आहे. पण कोकणही पर्यटनात कमी नाही. हे लोकांना केंव्हा कळेल जेंव्हा ते कोकणात येतील तेंव्हा आणि याची देही याची डोळा ती अनुभूती घेतील.

हा महामार्ग पूर्ण झाला असता तर एव्हाना अन्य महामार्गही कोकणातून अन्य जिल्ह्यांत गेले असते. तसे नियोजन करता आले असते. पण कसलं काय? जे सध्या या महामार्गाचे काम चालू आहे तेच रडतखडत चालू आहे. डिझेल इंजिनवर धावणारी कोकण रेल्वे आता विद्युत इंजिनवर सुसाट पळत आहे. त्यामुळे इंधनाची पुष्कळ बचत होत आहे. पण कोकणात जाण्यासाठी महामार्ग अपूर्ण स्थितीत असल्याने चारचाकी वाहने सुसाट नेता येत नाहीत. अशी स्थिती असल्याने कित्येक जण पुणे-कोल्हापूरमार्गे सिंधुदुर्ग जिल्ह्यात पोचतात. पुष्कळ फिरून जावे लागते? सार्वजनिक विकासाच्या आड येणाऱ्या गलिच्छ राजकारणामुळे कोकणवासी नाहक भरडले जात आहेत. यासाठी जनतेने कोडग्या राजकारण्यांना किती शिव्या-शाप द्यावे तेवढे अल्पच आहेत. देश विविध क्षेत्रात प्रगती करत आहे. नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. तरीही आम्ही अजून समृद्ध



अशा महामार्गाच्या प्रतीक्षेत वर्षे पुढे ढकलत आहोत. केवळ एकाच आशेवर आज ना उद्या होईल महामार्ग.

भांडण-वाद-हिंसक कृती या सामान्य कोकणी माणसाच्या रक्तात नाही. त्यामुळे तो कायम शांत असतो. याचे पाणी जोखले असे समजायचे का? लवकरात लवकर मुंबई-गोवा महामार्गास समृद्धी यावी आणि देशाच्या पर्यटनाच्या नकाशावर कोकण अधिक समृद्ध व्हावा, हीच एक कोकणवासी म्हणून इच्छा व्यक्त करतो. तसेच रस्ते मार्गे खड्डे मुक्त होऊन प्रवास समृद्धमय होवो अशीही आशा व्यक्त करतो.

समृद्धी महामार्ग असो अथवा अन्य कोणतेही नवीन महामार्ग हे देशाच्या विकासाचे दर्शक आहेत. देशातील रस्ते मार्गांचे जाळे वेगाने पसरत आहे. हे वेगवान प्रगतीचे लक्षण आहे. देश अशीच प्रगती करत राहो. हे करताना पुढचे पाठ आणि मागचे सपाट असे होऊ नये. विचार करताना एक देश म्हणून विचार केला पाहिजे.

साधारण वर्ष २०१५ मध्ये घोषित झालेल्या समृद्धी महामार्गाच्या एका टप्प्याचे उद्घाटन झाले हे नक्कीच चांगले आहे. कारण अल्प कालावधीत महामार्ग झाला आहे. त्याचा दर्जा त्याच्या दैनंदिन उपयोगात समजणार आहे. याकडे लोकांचेही बारीक लक्ष असेलच.

कोकणचा महामार्ग रखडला आणि विदर्भातील महामार्ग पुढे गेला म्हणून असूया वाटण्याचे काही कारण नाही. एक देश म्हणून व्यापक विचार झाला पाहिजे तर विविध राज्य, जिल्हे यांच्याशी नाळ घट्ट जोडता येईल. एक भारत म्हणून प्रखर राष्ट्रनिष्ठेने उभे राहूया.

**- जयेश राणे, मुंबई.**

---

टुडेज ब्लॉग

# भाकरीच्या भूगोलाचा प्रश्न!

संपूर्ण जग दोन वर्षे कोरोना या संसर्गजन्य आजाराचा सामना करत होतं. यातूनदेखील आज बरेचजण सावरू शकले नाहीत. प्रत्यक्ष हातावर ज्यांचे पोट होते त्यांच्या हाताला काम नव्हते, त्यांच्या जगण्याचा प्रश्न आजही ते सोडवू शकले नाही. सरकारी मदत मिळणार तरी किती.? रोजच्या जगण्याचा प्रश्न ज्यावेळी निर्माण होतो त्यावेळी अंधार पसरलेला असतो. कधी कमी आणि कधी जास्त पाऊस यामध्ये अडकलेला शेतकरी ज्यावेळी आपण पाहतो त्यावेळी मन सुन्न होऊन जातं. इकडे पोटाचा प्रश्न सुरू आहे आणि तिकडे काही लोक आपल्या इतिहासाबद्दल आणि धर्माबद्दल गप्पा मारतात, परंतु भाकरीच्या भूगोलाचा प्रश्न सोडवू शकत नाहीत.

नव्या आशा, आकांक्षा, नवी क्षितिजे धुंडाळत असताना येणाऱ्या वर्षात खूप काही करायचं असं म्हणत सरत्या वर्षाला आपण अवघ्या काही दिवसांनी निरोप देणार आहोत. वर्षाच्या शेवटच्या दिवशी मावळणाऱ्या सूर्यासोबत एखादी सेल्फी घेऊनदेखील आपण अपलोड करू. पण त्या आभासी परिभ्रमणामुळे आपण आपल्या सभोवतालचा निर्माण झालेला आभासदेखील बाजूला सारत चालूया. या वर्षात काय कमावलं? काय गमावलं? याची गोळाबेरीज करत असताना खूप काही हातातून सुटलं आणि खूप काही करायचं राहून गेलं असंच प्रत्येकांना वाटणार. खरंतर आपण खूप वेगवेगळे संकल्प केलेले असतात. ते पूर्ण करण्यासाठी तशी धावपळदेखील केलेली असते.

परंतु एकाच वेळी एकच व्यक्ती प्रत्येक ठिकाणी काम करू शकत नाही. त्यामुळे जो मूळ हेतू आहे तो कधीकधी बाजूला राहतो. त्यातच आजच्या बाबतीत बोलायचे झाले तर काही गोष्टी शक्यदेखील नाहीत. तुम्ही आणि आम्ही रोज एका नव्या समस्येचा किंवा संकटाचा सामना करत जगत आहोत. सकाळी उठल्यापासून ते संध्याकाळपर्यंत काहीतरी नवीन असे ऐकायला मिळते ज्यातून आपण निराश होतो, हताश होतो. तो हताशपणा काही काळापुरता जरी असला तरी त्यावेळी मात्र आपला उत्साह मावळणारा ठरवत असतो. त्यातही ज्यांच्या खांद्यावर य ा



देशाची धुरा देण्याची स्वप्न किंवा भाषा आपण करतो. त्या युवकांची अवस्था अत्यंत दयनीय झालेली पाहायला मिळते.

वाढत्या लोकसंख्येबरोबरच वाढती बेरोजगारी ही सर्वात मोठी समस्या तुमच्या आणि आमच्या समोर आहे. यावर मात करत असताना सर्वांचीच दमछाक होताना दिसते. प्रत्येक वेळी नवीन नियम, नवीन कायदे लागू होतात आणि त्यासोबत जुळवून घेताना आजचा युवक हवालदिल होत आहे. व्यवसायाभिमुख शिक्षण मिळावे किंवा युवकांच्या कला कौशल्यांमध्ये वाढ व्हावी आणि त्यातच त्याचे करिअर घडावे हा अजेंडा आपल्यासमोर ठेवला जात आहे. परंतु ज्या क्षेत्रात करिअर करायचे ते शिक्षण घेऊन किंवा ती डिग्री हातात असून देखील करिअर मात्र भलत्याच क्षेत्रात करावे लागत आहे. हातातल्या डिग्रीच्या भरवशावर आजचे करिअर ठरत नाही. हे स्पष्टपणे दिसत आहे. मग पीएचडी धारकांना देखील चहाची टपरी, वडापावची गाडी किंवा पाणीपुरी यासारखा व्यवसाय करावा लागतो. शेवटी नको असताना कोई भी धंदा छोटा नही होता, असेच म्हणावे लागते.


एकूणच काय तर आपल्या जगण्याच्या समस्यांमध्ये वाढ होताना दिसते. याबाबतीत समाजशास्त्रज्ञ आणि विचारवंत देखील चिंता व्यक्त करतात. परंतु ज्यावेळी प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ येते त्यावेळी प्रत्येक जण मूग गिळून गप्प बसतात. (अपवाद वगळता) मग तुमच्या आणि आमच्यातला माणूस आहे कुठे? हा प्रश्न पडतो. सोशल मीडियावर आज आपण पाहतो की, जगण्याची दिशा देणारे लाखो मोटिवेशनल व्हिडिओ व्हायरल होतात. ते व्हिडिओ पाहून त्या काळापुरतं असं वाटूनही जातं की, नक्की आपण फिनिक्ससारखी भरारी घ्यायला हवी किंवा घेऊ शकतो. परंतु जेव्हा आभासी जगाच्या बाहेर आपण येतो. त्यावेळी मृगजळाचा पाठलाग करणाऱ्या हरणासारखी आपली अवस्था होते. हातात काहीच शिल्लक राहत नाही आणि आपण फक्त आशेवर जगावे. बरं धावावं तरी किती काळ.? हा देखील आपल्यावर एक प्रकारचा मोठा अन्याय समजला जातो. आणि याच मानसिक ताणतणावात जगत असताना काही युवक स्वत:ला संपवतातदेखील. आजचं हे वास्तव अत्यंत भयावह आहे. यातून मार्ग काढणे ही आजच्या काळाची गरज आहे. काळाच्या ओघात सर्व काही मागे पडून जातं किंवा काळासोबतची भाषा आपण बोलतो. परंतु आज जे होत आहे त्याचे परिणाम समोर कित्येक वर्षे आपल्याला पाहायला मिळतात.

**- धम्मपाल जाधव.**

---

बोधकथा

## सिंहाची गुणज्ञता



एका सिंहाने एक हरिण मारले व त्यांस तो फाडून खाणार, इतक्यात त्या वाटेने एक चोर जात होता, तो त्यास म्हणतो, अरे सिंहा, या हरिणाचे अर्धे मांस तुझे व अर्धे माझे.'

हे ऐकून सिंह म्हणाला, 'अरे निगरगट्ट माणसा, तुझा येथे कोणत्याही प्रकारचा संबंध नसता, एकाकी पुढे होऊन, मी मारलेल्या सावजाचे अर्धे मांस तू मागतोस, या तुझ्या निर्लजपणाबद्दल मी तुला शिक्षा करण्यापूर्वी तू येथून चालता हो, नाही तर फुकट मरशील मात्र.' हे ऐकताच चोर भयाने पळून गेला.

इतक्यात दुसरा एक भला माणूस त्या वाटेने आला व सिंहास पाहून, त्यास टाळण्यासाठी दुसऱ्या वाटेने जाऊ लागला. ते पाहून सिंह त्यास आदराने हाक मारुन म्हणाला, 'अरे भल्या माणसा, भिऊ नकोस, तुझ्या चांगुलपणामुळे, या सावजाच्या मासांचा अर्धा भाग घेण्यास तू अगदी योग्य आहेस, इकडे ये आणि आपला वाटा घेऊन जा.'

इतके बोलून सिंहाने त्या सावजाचे दोन भाग करुन एक भाग आपण खाल्ला व दुसरा त्या माणसाकरिता ठेवून तो अरण्यात गेला.

**तात्पर्य : लोचटपणा करुन डोके उठविणाऱ्या माणसाचा लोकास कंटाळा येतो. पण जे सभ्य आणि भिडस्त आहेत, त्यांचा परामर्श लोक आपण होऊन घेतात.**

---

जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल - ४



त्यावेळी जर आपल्याजवळ क्षमा नसेल तर आपले जीवन उद्ध्वस्त होऊन जाते. म्हणून प्रत्येक मनुष्यासाठी क्षमा हे धर्माचे साधन मानले गेले आहे.

यानंतरचा धर्म आहे 'दान'. दुसऱ्याला न देता स्वत:च खाणे हा अपराध मानला जातो. जो केवळ स्वत:साठी अन्न शिजवतो आणि फक्त स्वत:च खातो, तो अन्न खात नसून पाप खातो, असे गीतेत म्हटले आहे. दुसऱ्याला देण्याइतकी उदारभावना तुमच्याजवळ नसेल तर निदान खाण्यापूर्वी देवाला नैवेद्य तरी अर्पण करावा. देव खात नाही हे तुम्हांला चांगले माहीत आहे. तो खात नाही म्हणून तर तुम्ही देवाला नैवेद्य दाखवता. त्याने खाल्ले असते तर तुम्ही त्याला दिले नसते. 'तुझ्याकडे हात माझ्याकडे भात' अशी मराठीत एक म्हण आहे. देव काही खात नाही अशी आपली समजूत आहे. पण ती खरी नाही. देव अर्पण केलेल्या पदार्थांवरील आपले ममत्व खाऊन टाकतो आणि तो पदार्थ 'प्रसाद' म्हणून आपल्याला परत करतो. नवीन कपडे स्वत: घालण्याआधी दुसऱ्याला वापरायला देण्याची एक प्रथा जुन्या काळी होती. वस्तूवरील ममत्व कमी व्हावे हाच हेतू त्यामागे होता. परंतु, आज मात्र असे नाही. आपले कपडे आपण घालतो आणि दुसऱ्याचेही कपडे आपणच घालतो.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

जनमानस

## निराश करणारी विधाने

कर्नाटकचे मुख्यमंत्री आपल्या राज्यातील गावे कर्नाटकात सामील करण्यासाठी विधाने करीत आहेत. स्वतंत्र मराठवाडासाठी परिषद होत आहेत. यातून पुढे काय होणार आहे? सर्वसामान्य जनता महागाई बेरोजगारीने हैराण होताना आजूबाजूला जे काही घडतं आहे, ते



सकारात्मक नाही याची जाणीव निराश करणारी ठरते.

**- प्र. मु. काळे, नाशिक.**

---

# जनता भरडली जातेय...

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद हा वाद तसा फार जुना आहे. म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या खंडप्राय अशा भारत देशाचा राज्य कारभार कसा करायचा? हा प्रश्न भारतीय नेत्यांपुढे उभा राहिला. त्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भाषावार प्रांत रचना करण्याची कल्पना सर्वांपुढे मांडली. ती सर्वांना आवडली. त्यानंतर हिंदी भाषा ही सर्वसमावेशक भाषा असावी, असे मत महात्मा गांधी यांनी सुचविले. हेही सर्वांना पटले. सर्व समावेशक भाषा म्हणजे भारतातील प्रत्येक प्रांतात हिंदी भाषा ही वापरली जावी, बोलली जावी. याचा उपयोग म्हणजे भारतातील कोणत्याही प्रदेशातील नागरिक भारतातील इतर कोणताही इतर भाषिक प्रदेशात गेला, तरी हिंदी या सर्वसमावेशक भाषेमुळे त्याला त्या भागात संपर्क मिळविण्यास कसलीही अडचण येणार नाही. अशा या भाषावार प्रांतरचनेमुळे भारतीय नेत्यांना राज्य कारभार करणे सोयीचे ठरले.**

आता सध्या भारतामध्ये २४ राज्ये व चार केंद्रशासित प्रदेशांचा समावेश झालेला आहे. यामध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांच्या भाषावर विभागणीमध्ये थोडीशी त्रुटी राहिली आहे. ती म्हणजे निपाणी, बेळगाव आजचे बेळगावी आणि धारवाड या भागात बहुसंख्य मराठी भाषिक नागरिक असूनही हा भाग कर्नाटक राज्याला जोडला गेला. त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये भाषावर प्रांत रचना झाल्यापासून असंतोष धुमसत आहे. ज्यावेळी गुजरात आणि महाराष्ट्र या संयुक्त महाराष्ट्रातून १९६० साली महाराष्ट्र वेळा झाला. त्यावेळेसच इथल्या नागरिकांमध्ये आपला भाग महाराष्ट्राला जोडला जाईल, अशी आशा लागून राहिली होती. परंतु तेव्हाही या नागरिकांच्या पदरी निराशात मिळाली. तेव्हाही अशाच दंगली घडल्या, परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. शेवटी न्यायमूर्ती श्री. महाजन यांनी हे प्रकरण न्यायप्रविष्ट करून ठेवले, त्याचा निकाल अद्यापही लागलेला नाही.

ही सल तेथील नागरिकांच्या मनामध्ये अजूनही कायम आहे. याचा राजकीय फायदा आजचे राजकारणी नेते घेऊन राजकारण करीत आहेत. वास्तविक पाहता कर्नाटकचे मुख्यमंत्री माननीय बसवराज बोम्मई यांना हा वाद उखडून करण्याची काहीही गरज नव्हती. आतापर्यंत महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमावाद कितीतरी वेळा उफाळून आला. परंतु त्याचे फलित काय? तर काही नाही. परिस्थिती जैसे थे ! आणि या वादातून कर्नाटकचा जय निश्चित आहे. कारण कितीही ओरडले आणि काहीही केले तरी सीमावाद हा आहे तसाच राहणार आहे. हे सर्वांनाच माहिती आहे. याच परिस्थितीचा फायदा कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी घेतला. उगाच लोकांमध्ये काहीतरी संभ्रम निर्माण करून खळबळ निर्माण करायची आणि आम्ही किती चांगले काम करीत आहोत असे लोकांना भासवायचे व राजकारण करायचे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांनी हेच केले.

पुढील वर्षी २०२३ मध्ये कर्नाटकमध्ये एप्रिल मे महिन्यात विधानसभेच्या निवडणुका येत आहेत. या निवडणुकीस लक्षात घेऊन त्यांनी या सीमा वादाला चालना दिली. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील काही गावे व सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील काही गावे हे कर्नाटकच्या बाजूने आहेत असा दावा केला. तसे पाहता कोणत्याही राज्याच्या मुख्यमंत्र्यांना त्यांचे राज्य सोडून राज्याबाहेरील इतर गावाविषयी बोलण्याचा काहीच अधिकार नाही. कारण हा विषय न्यायालयाच्या आधीन असतो. हा एक साधासुधा नियम कोणत्याही नागरिकांच्या किंवा नेत्यांच्या लक्षात आला नाही, किंवा कोणीही त्याकडे लक्षही दिले नाही. कोणी काही म्हटले की लगेच त्यावर आपले विचार व्यक्त करून राजकारण करू लागतात.

साहजिकच यामुळे लोकांमध्ये संभ्रम निर्माण होतो. कर्नाटकचे मुख्यमंत्री यांना आपल्या राज्यातील गावांविषयी आपुलकी आहे, पण महाराष्ट्राचे




मुख्यमंत्री माननीय एकनाथ शिंदे हे यावर काही बोलत नाहीत. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याविषयी महाराष्ट्रातून नाराजी होत आहे. त्यांच्यावर महाराष्ट्रात सर्व स्तरातून टीकेची झोड उठली आहे. तर तिकडे बेळगावीमध्ये कन्नड भाषिक नागरिकांमध्ये मराठी भाषिक नागरिकांविषयी तिरस्कार निर्माण होत आहे. झाले, कर्नाटकात कर्नाटकातील नागरिकांनी मराठी नागरिकांच्या गाड्या फोडायच्या व महाराष्ट्रात महाराष्ट्रीयन नागरिकांनी कर्नाटकच्या एसटीला काळे फसायचे.

आपल्या भारत देशात अनेक धर्माचे व वेगवेगळ्या भाषा बोलणारे नागरिक वर्षानुवर्षे गुण्यागोविंदाने एकत्रित राहतात. तेव्हा हे राजकिय मंडळी काहीतरी कुटिल कारस्थान करून समाजामध्ये दुफळी माजविण्याचे काम करतात. मग कर्नाटकच्या नेत्यांनी दुफळी माजवायची आणि महाराष्ट्रातील नेत्यांनी सरवासारव करायची हे नेत्यांचे राजकारण ओघाने आलेच. परंतु गरीब जनता! ज्यांच्या गाड्या फोडल्या त्यांचे किती नुकसान झाले? किंवा इकडे महाराष्ट्रात आंदोलन करताना विनाकारण मानसिक त्रास व पोलिसांचा लाठीचार्ज सहन करावा लागतो आहे. मग त्यांच्याकडे कोण पाहणार? यावेळच्या सीमावादाला कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई हे जबाबदार आहेत. नेत्यांचे राजकारण होते पण गरीब जनता मात्र भरडली जाते! असे होऊ नये.

**- अनिल जाधव, बार्शी.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## कस्तुरबाई कॉलेजच्या विद्यार्थीनीला एम.एड.पदवीसाठी सुवर्णपदक

**सोलापूर** : दिक्षांत समारंभात सोलापूर विद्यापीठ संलग्नित सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून एम. एड. पदवी मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्व प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास कै.श्री. राजशेखर कळसे सुवर्णपदक प्राप्त झाले. कु.मोहिनी सत्यनारायण करणकोट या विद्यार्थीनीस एप्रिल/मे २०२२ मध्ये विद्यापीठामार्फत घेतलेल्या परीक्षेत एम. एड. अभ्यासक्रमात सर्वाधिक उत्कृष्ट डिस्टींक्शन घेवून उत्तीर्ण झाल्यामुळे पदव्युत्तर विभागात सुवर्णपदक देण्यात आले. पु.अ.हो.सो.विद्यापीठाच्या प्रांगणात १८ व्या पदवीदान समारंभ मोठया उत्साहात पार पडला. कु. मोहिनी सत्यनारायण करणकोट या विद्यार्थीनीला या दिक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे सुहास पेडणेकर, माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई, प्रा. डॉ. राजेश डी. गादेवार प्र. कुलगुरु व सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मोहिनी सत्यनारायण करणकोट ही कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनची बी. एड. ची विद्यार्थीनी असून तिने बी.एड. परीक्षेत सुध्दा महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला, तसेच कै. श्री. राजशेखर कळसे एम. एड. मधून सुवर्णपदक मिळवले. तिला मार्गदर्शन करणारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अश्विन बोंदार्डे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाच्या जेष्ठ प्राध्यापिका डॉ. आयेशा रंगरेज आयक्यूएसी समन्वयक डॉ.बाळकृष्ण भावे व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दत्ता वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच एम. एड. विभागातील डॉ. विजयकुमार जोकारे, डॉ. पुष्पांजली इंगळे व डॉ.विद्या भोसले यांचे एम.एड. विभागाकडून विशेष असे मार्गदर्शन मिळाले.

## समर्थ स्पोर्ट्स अकॅडमीचे केतन व साहिल यांना रौप्य पदक

**सोलापूर** : उस्मानाबाद येथे थलेटिक फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धमध्ये २३ वर्षाखालील वयोगटात आर. एस. समर्थ्य स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी रौप्य पदकांची कमाई केली. यामध्ये केतन मासाळ याने ४०० मीटर अडथळ्याच्या शर्यतीत रौप्य पदक पटकावले. त्याचबरोबर साहिल जगताप व केतन मासाळ यांच्या रिले संघाने ४ x १०० रिले स्पर्धेत रौप्य पदक पटकावले. केतन मासाळ याची राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मुख्य प्रशिक्षक सूर्याजी लिंगडे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व खेळाडूंचे कबड्डी राज्य पंच मा. सुभाष माने* व मुख्य प्रशिक्षक सूर्याजी लिंगडे यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. त्या दोघांचा सत्कार झाला. यावेळी पोलीस हवालदार शिवानंद बिराजदार, विकास जाधव, सिध्दू बिराजदार व अकॅडमीतील सर्व खेळाडू आणि पोलीस प्रशिक्षण पूर्व केंद्रातील प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## जैन गुरुकुलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

**सोलापूर** : उस्मानाबाद येथे थलेटिक फेडरेशन ऑफ सोलापूर महानगरपालिका सोलापूर अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे संपन्न झालेल्या शालेय शहरस्तरीय बुध्दिबळ स्पर्धेत श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेच्या इयत्ता १० वीतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यामध्ये १९ वर्षाखालील गटात रितेश श्रीनिवास सादुल, साक्षी शाहुराज पाटील यांनी प्रथम क्रमांक मिळविला व १७ वर्षाखालील गटात प्रथमेश प्रशांत शिंदे, श्वेता नितिश पवार या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थ्यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडाशिक्षक सुभाष उपासे, प्रसन्न काटकर व क्रीडा विभागप्रमुख संजय पंडित यांचे वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी व सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक आशितोष शहा, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक राजकुमार काळे, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

## अल्पवयीन मुलीचे प्रकरणी चौघां विरोधात गुन्हा दाखल

**पंढरपूर** : परीक्षेसाठी महाविद्यालयात गेलेल्या पंढरपुर तालुक्यातील येथील अल्पवयीन तरुणीचे अपहरण केल्या प्रकरणी चार जणांविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी गणेश किसन केंगार रा. भिवघाट तालुका सांगली, सोमनाथ दिलीप पडळकर रा. पखालपूर, आबा जगन्नाथ कारंडे व महेश खांडेकर दोघेही रा. गुरसाळे या चौघांविरोधात अज्ञात कारणासाठी मुलीस पळून नेल्याचा गुन्हा दाखल. सदर मुलगी येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात बारावी मध्ये शिक्षण घेत असून तिला वडील रोज दुचाकीवरून येथे सोडत असत. शनिवार १० रोजी तिची परीक्षा असल्यामुळे दुपारी दोन वाजता वडिलांनी तिला महाविद्यालयात सोडले व पाच वाजता तिला घेऊन जाण्यासाठी महाविद्यालया बाहेर येऊन थांबले होते. परंतु बराच वेळ ती बाहेर न आल्यामुळे त्यांनी आत जाऊन चौकशी केली. मात्र ती महाविद्यालयात नसल्याचे आढळून आले. यामुळे त्यांनी तिच्या मैत्रिणींना व नातेवाईकांना देखील फोन करून विचारणा केली परंतु कोणा कडूनही तिच्या विषयी माहिती मिळाली नाही. दरम्यान काही दिवसापूर्वी गणेश केंगार हा सदर मुलीस घेऊन गेला होता. तसेच सोमनाथ पडळकर याने तिच्या मोबाईलवर मेसेज देखील केले होते. यासाठी त्यांना आबा कारंडे व महेश खांडेकर यांनी मदत केली होती. यामुळे आता देखील मुलीस पळवून नेण्यांमध्ये या चौघांचा हात असल्याचा संशय त्यांनी फिर्यादीमध्ये व्यक्त केला आहे. यावरून वरील चौघां विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास वसई भागवत करीत आहेत.

## ग्राहकास बोलावून घेतल्याच्या कारणावरून दुकानदारास मारहाण

**सांगोला** : येथील बाजारात समोरासमोर दुकान असताना आपल्या ग्राहकास का बोलावून घेतले? या कारणावरून काठी आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत लक्ष्मण शंकर लमाने (वय ३२) हा दुकानदार जखमी झाला. ही घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्याला सांगोला येथे प्राथमिक उपचार करून मंजूर(पत्नी) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्याला राजू रामू लमाने याने मारहाण केली अशी नोंद पोलिसात झाली आहे.

# महावितरणच्या कंत्राटदाराकडून मेंटेनन्सची कामे बोगस

### कंत्राटदार मालामाल, अधिकारी जोमात... शेतकरी कोमात

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**





दक्षिण सोलापूर महावितरण दिवसेंदिवस डबघाईस येत असल्याची ओरड आपण नेहमीच ऐकत आलो. परंतु, या मागील कारणांची चर्चा शेतकऱ्यांमध्ये होते आहे. या तालुक्यात महावितरणच्या ठरलेल्या कंत्राटदाराकडून जी काही मेंटेनन्सची कामे केली जातात, ती कामे पूर्णत: बोगस होत असल्याची ओरड नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात होत असतानाच अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे महावितरण तोट्यात येत असून बोगस कामे करत लाखोंची बिले उचलून कंत्राटदार मालामाल होत आहेत.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील १६ केव्हीकेडीपी हे एचव्हीडीएस योजनेअंतर्गत ३ ते ४ वर्षापासून तालुक्यातील मंद्रुप, भंडारकवठे, अंत्रोळी, बोरामणी, वडकबाळ, होटगी, हगलूर या सबस्टेशन अंतर्गत अनेक गावात बसवण्यात आले. परंतू ते आजतागायत बंद अवस्थेत असून अवाजवी वीज बिल आकारले जात आहे.

तालुक्यातील सबस्टेशनच्या मेंटेनन्सचे काम एका कंत्राटदारास, तर एलटी व ११/१६ केवी एचपी लाईटच्या मेंटेनन्सचे काम दुसऱ्या कंत्राटदारास तर ट्रान्सफार्मर बसवणे व त्या ट्रान्सफार्मरच्या मेंटेनन्सची कामे तिसऱ्या कंत्राटदारास असल्याची माहिती महावितरणकडून सांगण्यात आली. या तालुक्यात वारा, वादळ पाऊस मोठ्या प्रमाणात झाल्यानंतर तालुक्यातील जे काही झुकलेले पोल आहेत ते पोल सरळ करणे, झाडे तोडणे, लोंबकळलेल्या अथवा तुटलेल्या विद्युततारा नीट करणे, किटकॅट बदलणे व बसवणे, ज्या ठिकाणी केबल बदलण्याची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी केबल बदलणे आदीसह प्रत्येक ट्रान्स्फरन्सच्या ठिकाणी किटकॅटची पेटी असते. त्या पेटीला दरवाजा व कुलूप बंद अवस्थेत लावून ठेवणे आवश्यक असताना मात्र, या गंभीर बाबीकडे दस्तुरखुद्द महावितरण व महावितरणचे संबंधित मेंटेनन्सचे कंत्राटदार का दुर्लक्ष करतात याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. या बेजबाबदारपणामुळे व हलगर्जीपणामुळे एखाद्या शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यास त्यास जबाबदार कोण? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो आहे. विद्युत प्रवाह सुरू असलेल्या या डब्याला दरवाजावर कुलूप नसल्यामुळे कोणीही येऊन या ठिकाणी नको तो कारभार करू शकतात किंवा यामुळे एखाद्याचा अपघात होऊन मृत्यू झाल्यास त्यास जबाबदार कोण? कारण यापूर्वी अनेक दुर्घटना अशा पद्धतीने झाल्या आहेत. तेव्हा या गंभीर बाबींची दखल घेणे तेवढेच गरजेचे असल्याचेही बोलले जात आहे.

महावितरणचे अधिकारी व नेमून दिलेले कंत्राटदार यांनी मेंटेनन्सची कामे बोगस न करता उत्कृष्ट दर्जाची केल्यास महावितरण तोट्यात येणारच नाही. परंतु तसे न होता संबंधित सर्व कामे ही बोगस होत असल्याने कंत्राटदार मालामाल होत असून त्यांना पाठीशी घालणारे महावितरणचे संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यात संगनमत असून 'मेरी भी चूप तेरी भी चूप' म्हणत शेतकऱ्यांचा वाली कोण असा प्रश्न पडला आहे. अशा पद्धतीने काम करत असल्याने महावितरण नफ्यात येण्याऐवजी दिवसेंदिवस तोट्यातच चाललेली आहे.

### पंचनामे करा, सत्य बाहेर येईल

दक्षिण तालुक्यात महावितरणच्या मेंटेनन्सची कामे करणाऱ्या कंत्राटदारांची टीम मोठ्या प्रमाणात बोगस कामे करत असल्याच्या अनेक तक्रारी होत असल्याने या कामाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी होण्याची गरज असून स्थानिक अधिकाऱ्यांना कुठल्याही प्रकारच्या सूचना न देता महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून स्पॉट पंचनामा झाल्यास कंत्राटदाराचा बोगसपणा उघड देऊन सत्य बाहेर येऊ शकते. दक्षिण सोलापूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये ११/१६ केवी ट्रान्सफार्मबद्दल अनेक तक्रारी आल्या असून त्यावर संबंधित ठेकेदार यांना लेखी तोंडी व प्रत्यक्ष दूरध्वनी संपर्क साधला असता संबंधित ठेकेदार हे लवकरात लवकर डी. पी. दुरुस्त करुन देतो सांगितले आहे. तरी देखील संबंधित ठेकेदार हे दोन ते तीन दिवसात डी. पी. दुरुस्त होईल, असे सांगितले. यासंदर्भात आम्ही दक्षिण सोलापूर तालुक्यातील डी. पी.च्या संदर्भात वरिष्ठाकडे लेखी पत्राद्वारे कळविले आहे.

**- संदीप पाटील,**
उपकार्यकारी अभियंता दक्षिण सोलापूर

# भोगाव आणि शांती चौक येथील ढाब्यावर धाड; २ चालक आणि ९ दारुड्यांना दंड

**सुराज्य/सोलापूर**



राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने रविवारी रात्रीच्या सुमारास शहरातील अक्कलकोट रोड व भोगाव येथील धाब्यावर अचानक धाडी टाकून २ धाबा चालक आणि दारु प्राशन करणारे ९ अशा एकुण ११ जणांवर गुन्हे दाखल केले. त्यापैकी २ धाबाचालकांना प्रत्येकी २५ हजार तर ९ ग्राहकांना प्रत्येकी २ हजार रुपये दंडाची शिक्षा न्यायदंडाधिकारी नम्रता बिराजदार यांनी सोमवारी सुनावली.

शुल्कच्या पथकाने सोलापूर-बार्शी रोडवरील भोगाव गावाच्या हद्दीतील होटेल गावरान तडका या ठिकाणी धाड टाकली. होटेल मालक बलभीम शिवाजी तांबे (रा. अंबिकानगर, बाळे) याच्यासह ग्राहक सोमनाथ बसवराज चौगुले, अनिल तायाप्पा तांबे, नागनाथ रामलिंग कल्याणकर, परमेश्वर चंद्रकांत माने व परमेश्वर हरिश्चंद्र शेळके यांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून दारूच्या बाटल्या ५ खुर्ची असा २ हजाराचा माल जप्त केला.

यानंतर भरारी पथकाने अक्कलकोट रोडवरील शांती चौकात असलेल्या हॉटेल दीपक या धाब्यावर धाड टाकली. त्याठिकाणाणी हॉटेलचा मालक चंद्रकांत रामण्णा साळुंखे (रा. विवार पेठ) आणि दारु पित बसलेले संगमेश्वर मलव्या राठीमाणी, प्रकाश गणू चव्हाण, चिदानंद अंजनप्पा बिराजदार व रमेश धनजू चव्हाण यांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून दारूची बाटली आदी ५४० रुपयाचा माल जप्त केला. त्यानंतर सर्व आरोपींविरुद्ध दारुबंदी अधिनियमाप्रमाणे नुसार गुन्हा दाखल केला. आणि एक दिवसात तपास करून आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते.त्याप्रमाणे न्यायालयाने त्यांना दंडाची शिक्षा सुनावली. अधीक्षक नितीन धार्मिक व उपअधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निरिक्षक सदानंद मस्करे, सुनिल कदम, अंकुश आवताडे, सुनिल पाटील, उषाकिरण मिसाळ, गणेश उंडे, गजानन होळकर, प्रियंका कुटे, अनिल पांढरे, प्रशांत इंगोले, इस्माईल गोडीकट, प्रकाश सावंत व वाहनचालक रशीद शेख व मारुती जडगे आदींनी ही कारवाई केली.

# गुरुमुळे मनुष्याला परमात्म्याची अनुभूती

### सदगुरु डॉ.शिवकुमार महास्वामीजी : अध्यात्मिक प्रवचनमालेस भाविकांची गर्दी

**सुराज्य/सोलापूर**



गुरूंनी मार्ग दाखवल्यामुळे आपण जीवनात यशस्वी होतो. गुरूंमुळेच मनुष्याला परमात्म्याची अनुभूती होते, असे प्रतिपादन सद्गुरु श्री. डॉ. शिवकुमार महास्वामीजी यांनी केले. ओंकार आश्रम श्री सिध्दारुढ मठातर्फे जुळे सोलापुरातील इंडियन मॉडेल स्कूलजवळ आयोजित सात दिवसीय अध्यात्मिक प्रवचनमालेचा सोमवारी सहावा दिवस होता.

सद्गुरु श्री. डॉ. शिवकुमार महास्वामीजी यांनी सहाव्यादिवशी 'सद्गुरू कृपा झालीया पूर्ण, जनची होय जनार्दन' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. शिवकुमार महास्वामीजी म्हणाले, आपल्यावर संकट आल्यावर आपण देवाची प्रार्थना करतो. परंतु सुखाच्या काळातही देवाचे नाव घेतले तर दुःख वाट्याला येणारच नाही. परमात्माप्राप्तीचे मार्ग गुरु दाखवतात. प्रपंच, परमार्थ, धर्मपालन या सर्व प्रक्रियेत गुरूंचे स्थान मोठे आहे. जन्म आणि मृत्यू प्रत्येकाच्याच वाट्याला आहे. परंतु जन्म ते मृत्यू यादरम्यान आपण समाजासाठी किती चांगले कार्य करतो त्याला अधिक महत्त्व आहे, असेही सद्गुरु श्री. डॉ. शिवकुमार महास्वामीजी यांनी सांगितले. मठाधीश परमपूज्य मातोश्री सुशांतादेवी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

**प्रवचनमालेचा समारोप**

अध्यात्मिक प्रवचनमालेच्या सातव्या आणि शेवटच्यादिवशी मंगळवारी सद्गुरु श्री. डॉ. शिवकुमार महास्वामीजी 'नाम संकीर्तन साधन पै सोपे, जळतील पापे जन्मांतरीची' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी भाविकांनी सायंकाळी ठिक ६.३० वाजता उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## मल्लिकार्जुन हायस्कूलला सॉफ्टबॉल स्पर्धेत उपविजेतेपद



**सुराज्य/सोलापूर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत,सोलापूर महानगरपालिका व जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयाच्या वतीने झालेल्या शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये श्री मल्लिकार्जुन हायस्कूलच्या १४ वर्षाखालील मुले व मुलींच्या संघानी उपविजेतेपद मिळविले. या सर्व यशस्वी खेळाडूंची मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आले. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक गंगाराम घोडके,परमेश्वर चांदोडे यांचे मार्गदर्शन लाभले .या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक आप्पासाहेब हत्तुरे, संस्थेचे अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ, मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे, धरेप्पा हत्तुरे, गिरमल्ला बिराजदार यांनी कौतुक व अभिनंदन केले.

## दाइंगडेवाडी येथे विष पिऊन आत्महत्या

**मोहोळ** : दाइंगडेवाडी (ता.मोहोळ) राहणाऱ्या शिवाजी आजिनाथ सरवदे (वय ४६) याने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्या केली. शनिवारी दुपारी हा प्रकार घडल्यानंतर त्याला मलिकपेठ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तो सोमवारी दुपारी मरण पावला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### बालाजी अमाईन्स महिला टेनिस स्पर्धा

# भारताच्या अंकिता रैनाला अव्वल मानांकन


**सुराज्य/सोलापूर**



महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओॲसिस, प्रिसीजन, जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत बालाजी अमाईन्स सोलापूर ओपन २५०००डॉलर महिला टेनिस स्पर्धेत अंतिम पात्रता फेरीत भारताच्या श्रीवल्ली रश्मिका भामिडीपट्टी, जेनिफर लुइखम व शर्मदा बाळू यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करत मुख्य फेरीत प्रवेश केला.

एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे सूरू असलेल्या या स्पर्धेत अंतिम पात्रता फेरीत साऊथ कोरियाच्या बिगर मानांकित जिओ जंग हिने भारताच्या सातव्या मानांकित हुमेरा बहर्मसचा ०-६, ६-४, १०-६ असा पराभव करत मुख्य फेरीत धडक मारली. भारताच्या चौथ्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिडीपट्टीने साई संहिता चमर्थीचा ६-२, ६-३ असा तर पाचव्या मानांकित जेनिफर लुइखमने अमेरीकेच्या तेजा तिरुनेलवेलीचा ६-४, ६-४ असा पराभव करत मुख्य फेरीत प्रवेश केला. आठव्या मानांकित शर्मदा बाळूने श्रेया तातावर्तीचा १-६, ६-१, १०-८ असा तर सर्बियाच्या अव्वल मानांकित कॅटरिना कोझारोवने भारताच्या सोहा सादिकचा ६-२, ६-१ असा पराभव करत मुख्य फेरी गाठली.

## दोन ठिकाणी दुकान फोडून ७० हजारांची चोरी



**अक्कलकोट** : वागदरी रोड, माणिक पेठ अक्कलकोट येथील दोन दुकान फोडून ७० हजार रुपयाचे रोख व मुद्देमालाची चोरी झाल्याची घटना घडली आहे. याबाबत उत्तर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस सूत्राकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, अक्कलकोट येथील वागदरी रोड माणिक पेठ येथे महेश गुरुलिंगप्पा लंगोटे (वय ३९, रा.स्टेशन रोड, शिवपुरी, अक्कलकोट) यांचे महेश ट्रेडर्स नावाचे किराणा व होलसेल दुकान असून फिर्यादी हे रात्री ९ च्या सुमारास दुकान बंद करुन घरी गेले होते. सोमवार, दि.१२ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी नेहमीप्रमाणे दुकान उघडण्यासाठी आले असता दुकानाला लावलेले शटरचे कडी-कोयंडा उचकटून शटर उघडून गल्ला पेटीत ठेवलेली चिल्लर व रोख रक्कम २० हजार रुपयाची चोरी झाल्याचे लक्षात आले. याच परिसरात असलेले क्षिरसागर इंजिनिअरिंग वर्कशॉप येथील अंदाजे ५० हजार रुपये किंतीचे पितळी मेटल व स्टिच बुर्शींगची चोरी झाल्याची घटना घडल्याने फिर्यादी यांनी अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात तक्रार दिल्याने अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील अज्ञात तीन चोरटे हे फिर्यादी यांच्या दुकानात लावलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये रेकॉर्ड झाल्यामुळे पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवुन यातील एक आरोपीस जेरबंद करण्यास यश मिळाले असून सदरील आरोपी हा माणिक पेठ परिसरात असल्याचे पोलिसांना प्रत्यक्षदर्शनी माहिती मिळाली आहे. या घटनेतील अधिक तपास पोहेकॉ चिंचोळकर हे करीत आहेत.

# तपोरत्नं पुण्यस्मरण : चित्रकला व रांगोळी स्पर्धेत २५०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**सुराज्य/सोलापूर**




निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त निलम नगर येथील नेताजी शिक्षण संकुलात व राजराजेश्वरी विनायक नगर येथील शिक्षण संकुलात आयोजित चित्रकला स्पर्धेत १९१९ व रांगोळी स्पर्धेत ५८२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

निलम नगर येथील नेताजी प्राथमिक मराठी , इंग्लिश मिडियम व माध्यमिक प्रशालेत आयोजित रांगोळी व चित्रकला स्पर्धेचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले मुख्याध्यापिका विजयलक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आंळगे,परिक्षक शैलेश स्वामी, मिनाक्षी वांगीकर आदी उपस्थित होते.पाच गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.वैशाली इंडे, जयश्री बिराजदार, विजयालक्ष्मी माळवदकर,उमादेवी कुंभार, सविता रामशेट्टी, भाग्यश्री महाजन आदींनी परिश्रम घेतले. विनायक नगर येथील राजराजेश्वरी प्राथमिक व माध्यमिक शाळेत आयोजित चित्रकला व रांगोळी स्पर्धेत हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचे उदघाटन मुख्याध्यापक रविशंकर कुंभार व मुख्याध्यापिका वैशाली कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक रविशंकर कुंभार यांनी पूज्य महास्वामीजींच्या जीवन कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.

# नव्या बदलास सक्षमपणे सामोरे जा : प्रा. डॉ. पेडणेकर

सुराज्य/सोलापूर

**'केवळ पदवी प्रमाणपत्रावर नोकरी मिळणार नाही. विविध कौशल्ये आत्मसात केल्यानंतरच नोकरी मिळू शकेल. विद्यार्थ्यांनी नवनवीन कौशल्ये आत्मसात करावीत. आता जग वेगाने बदलत आहे, त्यामुळे या नव्या बदलास सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी सक्षमपणे तयार राहावे आणि येणाऱ्या आव्हानांना तोंड देत संकटाशी सामना करण्याचे आवाहन मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. सुहास पेडणेकर यांनी केले.'**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा १८वा दीक्षांत समारंभ कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. पेडणेकर हे बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. राजेश गादेवार, कुलसचिव योगिनी घारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपुर, वित्त व लेखाधिकारी सीए श्रेणीक शाह व विविध विद्याशाखेचे अधिष्ठाता यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी एकूण १७ हजार १९१ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आले. याचबरोबर ५० संशोधक विद्यार्थ्यांना पीएचडी पदवी तर ५७ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सुवर्णपदके देऊन सन्मानित करण्यात आले. विविध विद्याशाखेच्या अधिष्ठातांनी स्नातकांना पदवी देण्याची विनंती केल्यानंतर कुलगुरूंनी पदवी बहाल करत असल्याचे घोषित केले. विद्यापीठाच्या विकासाच्या अहवालाचे वाचन कुलसचिव योगिनी घारे यांनी केले. मान्यवरांचा परिचय डॉ. अंजना लावंड यांनी करून दिला.

प्रा. डॉ. पेडणेकर म्हणाले की, 'पदवी घेऊन बाहेर पडताना विद्यार्थ्यांनी स्वतःला काही प्रश्न विचारण्याची गरज आहे. आज आपण कुठे आहोत? आपणाला कुठे जायचे आहे? त्यासाठी कोणते ज्ञान आणि स्त्रोत मिळविणे गरजेचे आहे? जे यश तुम्हांला मिळवायचे आहे, ते तुम्ही कशा पद्धतीने साध्य करू इच्छिता? या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी शोधावीत. ती शोधली आणि आत्मपरीक्षण केले तर पुढे जाण्याचा मार्ग प्रशस्त होऊ शकेल. कोविडच्या कालखंडाने आपणाला खूप काही शिकवले असे सांगून डॉ. पेडणेकर यांनी या पुढच्या काळात डिजिटल क्षेत्रामध्ये ४० ते ५० टक्के नोकऱ्या असणार आहेत, असे सांगितले. खाजगी क्षेत्रामध्ये नोकरी करणारे पूर्वी दोन ते तीन नोकऱ्या बदलत असत. या पुढच्या काळात दोन ने तीन करिअर बदलावे लागतील, अशी तयारी विद्यार्थ्यांनी ठेवावी, असेही ते म्हणाले. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाविषयी डॉ. पेडणेकर यांनी या विद्यापीठाने कमी वयामध्ये कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मोठी उंची गाठल्याचे नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस म्हणाल्या की, 'आजचा काळ हा संक्रमणाचा काळ आहे. या काळामध्ये आपणाला नेमके काय साध्य करावे लागेल, याचा विचार प्रत्येकाने करण्याची गरज आहे. मानवी विकास हे आपले अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. आपण काय मिळवतो, यापेक्षा इतरांना काय देतो हे यामध्ये महत्त्वाचे आहे. मनुष्यबळ हेच भारताचे सामर्थ्य आहे, त्यामुळेच आपला देश जगातील सर्वश्रेष्ठ देश ठरू शकतो. मनुष्यबळ विकासावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. दर्जेदार शिक्षण महत्त्वाचे असून आपले आरोग्य सांभाळणे हे देखील महत्त्वाचे आहे. यापुढच्या काळात येणारी आव्हाने मोठी असणार आहेत, ती आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांनी अंगी बाळगावे आणि कधी-कधी अपयश मिळाले तरी त्यातूनच पुढे जाण्याचा मार्ग शोधावा, असे आवाहन त्यांनी केले.



**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना पदवी देऊन सन्मानित करताना मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. सुहास पेडणेकर, कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. राजेश गादेवार, कुलसचिव योगिनी घारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपूर, वित्त व लेखाधिकारी श्रेणीक शाह आदी.**

प्रारंभी १०.४५ वा. दीक्षांत मिरवणूक निघाली. यामध्ये परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपुर हे ज्ञानदंड हाती घेऊन अग्रभागी सहभागी झाले होते. यामध्ये मान्यवरांसह पदवी स्वीकारणारे स्नातक दीक्षांत सोहळ्यासाठीचा विशेष बाराबंदी पोशाख परिधान सहभागी झाले होते. यामुळे विद्यापीठ कॅम्पसमध्ये एक उत्साह आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली तर राष्ट्रगीताने सांगता झाली. या सोहळ्यासाठी विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाचे सदस्य, प्राचार्य, सुवर्णपदकाचे देणगीदार, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा. ममता बोल्ली व प्रा. श्रुती देवळे यांनी केले. आभार कुलसचिव योगिनी घारे यांनी मानले.



## 'त्या' विधानांच्या निषेधार्थ बार्शीत रास्ता रोको

**सुराज्य/बार्शी** : राज्यपाल कोषारी आणि उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी महापुरूषाबद्दल केलेल्या त्या वादग्रस्त विधानांच्या निषेधार्थ सोमवारी बार्शी शहरात विविध पुरूगामी संघटना व पक्षांनी आयोजित केलेल्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच शहरातील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले त्यानंतर ठिय्या आंदोलन करण्यात आले. ते आंदोलन झाल्यांनतर त्या विधानांच्या निषेधाचे निवेदन तहसिलदार सुनील शेरखाने यांना देण्यात आले. या विविध आंदोलनामध्ये उपस्थित मान्यवरांचे भाषणे झाली.

यावेळी शिवसेना नेते भाऊसाहेब आंधळकर, शिवसेना शहरप्रमुख दिपक आंधळकर, माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, माजी उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले, वंचित बहुजन आघाडीचे अजित कांबळे, शंकर वाघमारे, विवेक गजशिव, संभाजी ब्रिगेडचे आनंद काशिद, राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्ष सुवर्णा शिवपुरे, विक्रम सावळे, कॉँग्रेसचे वसीम पठाण, मोहसीन तांबोळी, किशोर मांजरे, मयुर डोईफोडे, विद्यार्थी सेनेचे पांडुरंग घोलप, हेमंत रामगुडे, शेतकरी संघटनेचे हनुमंत भोसले, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष बालाजी डोईफोडे, पांगरी विभाग प्रमुख सुरज जगदाळे, कुंदन गायकवाड, अशोक नाना आगलावे, उपस्थित होते. हा रास्ता रोको यशस्वी करण्यासाठी गणेश सावळे, अविनाश आगलावे, शहबाज शेख आदींनी परिश्रम घेतले.

## चंद्रकांत पाटील यांच्या प्रतिमेस जोडेमार आंदोलन

**सुराज्य/सोलापूर** : राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी डॉ. महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल अपशब्द वापरल्याचा सोलापुरात राष्ट्रवादी कॉँग्रेसच्यावतीने निषेध करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पाटील यांच्या प्रतिमेस जोडे मार आंदोलन करण्यात आले. भाजपाच्या नेत्यांनी महापुरूषांच्याबाबत बोलताना तोंड सांभाळावे अन्यथा रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा राष्ट्रवादीचे निरीक्षक शेखर माने यांनी दिला.

संभाजीनगर येथे एका कार्यक्रमात महापुरूषांबद्दल अपशब्द वापरून समस्त जनतेच्या भावना तर दुखविल्याच परंतु, सध्या राज्यात भाजपा नेते छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल देखील अनेक वेळा चुकीचे वक्तव्य करत आहेत. यांच्या निषेधार्थ शहर राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षातर्फे शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात चंद्रकांत पाटील यांचा निषेध व्यक्त करत त्यांच्या प्रतिमेला जोडीदार आंदोलन करण्यात आले. यावेळी घोषणा बाजी करण्यात आली. यावेळी शहराध्यक्ष भारत जाधव, प्रदेश सचिव संतोष पवार, जुबेर बागवान, किसन जाधव, प्रमोद भोसले, बसवराज कोळी, विजय भोईटे, अनिल बनसोडे, जावेद खैरदी, सरफराज शेख, संपन्न दिवाकर, अमीर शेख, सागर भोसले, महेश पवार, रुपेश भोसले, इरफान शेख, प्रशांत बाबर, चेतन गायकवाड, निशांत सावळे, करेप्पा जंगम, मिथुन लोखंडे, अल्मेराज आबादीराजे तसेच महिला शहराध्यक्ष सुनीता रोटे, कार्याध्यक्ष लता ढेरे, नलिनी चंदेले, सायरा शेख, वंदना भिसे, खांडेकर नीला, नसीमा शेतसंदी, चित्रा कदम, माधुरी कांबळे, संगीता जोगदनकर व कार्यकर्ते उपस्थित होते.



**१८ वर्षाखालील राज्य अजिंक्यपद स्पर्धा अलिबाग (रोहा ) या ठिकाणी भारतातील सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय खो-खो वेळापुरचा अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाचा खेळाडू रामजी हरिश्चंद्र कश्यप याचा सत्कार उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला**

## गरबडे यांच्यावरील गुन्हे रद्द करावेत

### भीम सैनिकांनी मोर्चाद्वारे केली मागणी

सुराज्य/सोलापूर

राज्यपाल भगतसिंग कोशारी व चंद्रकांत पाटील यांचा निषेध व्यक्त करत त्यांची हकालपट्टी करावी व भीमसैनिक मनोज गरबडे याच्यावर दाखल केलेले गुन्हे रद्द करावेत या मागणीसाठी सोमवार दि. १२ डिसेंबर रोजी भीमसैनिकांनी मोहोळ तहसिल कार्यालयावर भव्य मोर्चा काढला.

राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोशारी यांनी काही दिवसापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांचेबद्दल अपशब्द वापरले होते तर मागील तीन दिवसापूर्वी उच्चशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. जोतीबा फुले यांच्याबद्दल अपशब्द वापरले. यामुळे मनोज गरबडे याने शाई फेकली मग त्याच्यावर प्राणघातक हल्ला केल्याचे कलम कसे लावण्यात आले? ते रद्द करण्यात यावे, त्यांच्यावरील नियमबाह्य दाखल केलेले गुन्हे रद्द करावेत, असा सूर भीमसैनकांनी मोर्चा दरम्यान व्यक्त केला.

मोहोळ येथील जयभिम तरुण मंडळाने या मोर्चाचे आयोजन केले होते.

याप्रसंगी माजी सरपंच बिलाल शेख यांनी या मोर्चास मुस्लीम समाजाचा पाठिंबा जाहीर केला. यावेळी तहसिलदार प्रशांत बेंडसे यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी गौतम क्षीरसागर, शोभा ससाणे, मीना बनसोडे, अवी क्षीरसागर, दादाराव क्षीरसागर, विशाल क्षीरसागर, तारा फडतरे, नंदा बनसोडे, रेखा बनसोडे, मनिषा फडतरे, कमल साखरे, लखन घाटे, विशाल बनसोडे, संतोष गायकवाड, धर्मा कापूरे, विकास बनसोडे, गौतमी क्षीरसागर,संगीता बनसोडे,भालचंद्र कांबळे, बापू कांबळे, संदीप सोनवणे, किर्तीरत्न क्षीरसागर, रोहन बनसोडे , बाळू क्षीरसागर, विशाल बनसोडे, बालाजी क्षीरसागर, आकाश क्षीरसागर, वैभव सोनवणे, सिदार्थ क्षीरसागर, दिनेश क्षीरसागर, गणेश क्षीरसागर, विकी बनसोडे, विकी कांबळे,वर्षा दुपारगुडे, तारामती फडतरे, रंजना कांबळे, आदीसह भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वडिलांच्या नाकाला चावले; मुला विरुद्ध गुन्हा

**सुराज्य/मंगळवेढा** : डोंगरगाव तालुका मंगळवेढा येथे घरगुती भांडणातून मुलाने आपल्या वडिलांना विटाने मारहाण करून नाकास चावा घेऊन जखमी केले. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. आबा बापू झेंडे (वय ४५ रा. डोंगरगाव) असे जखमीचे नाव आहे. त्यांना मंगळवेढा येथे प्राथ. उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## सज्जन लोखंडे यांची निवड

सुराज्य/अकलूज

अकलूज येथील सामाजिक कार्यकर्ते सज्जन लोखंडे यांची नुकतीच मानवहित लोकशाही पक्षाच्या पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

मानवहित लोकशाही पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन साठे यांच्या आदेशावरून महासचिव सुरेश खाडे यांनी लोखंडे यांचे सामाजिक कार्य पाहून त्यांना पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी काम करण्याची संधी दिली असून नुकतेच त्यांना निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले.

निवडीनंतर लोखंडे म्हणाले की, 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या विचारांना तळागाळात पोहोचविण्याचे कार्य ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून करणार आहे.



## बुरुड समाजातर्फे संत केतेश्वर जयंती साजरी

सुराज्य/सोलापूर

बाराव्या शतकात होऊन गेलेले बुरुड समाजाचे संत श्री बुरुड केतेश्वर महाराज यांची जयंती शनिवार दि. १० रोजी सकाळी सोलापूर महानगरपालिकेत सोलापूर शहर बुरुड समाजाच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

भारत देशात फक्त सोलापूर महापालिकेतच संतश्रेष्ठ केतेश्वर महाराजांची जयंती शासकीय पद्धतीने साजरी केली जाते. महापालिकेच्या कौन्सिल हॉलमधील संत केतेश्वरांच्या साडेपाचफुटी तैलचित्रास व आयुक्त कार्यालयातील प्रतिमेस सहाय्यक आयुक्त विक्रम पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला व आरती करण्यात आली, त्यावेळी संत केतेश्वरांचा जयघोष करण्यात आला. समाजाचे उपाध्यक्ष चंदन वडतिले यांनी पौरोहित्य केले. सर्वांना लाडवांचा प्रसाद वाटण्यात आला. त्यानंतर झालेल्या कार्यक्रमात बुरुड समाजाचे अध्यक्ष, पत्रकार दशरथ वडतिले यांनी प्रास्ताविक भाषणात संत केतेश्वरांचा जीवन कार्यावर प्रकाशझोत टाकला व समाजाला पुढे नेण्यासाठी संतांच्या विचारांची आवश्यकता असल्याचे सांगितले. माजी अध्यक्ष रमेश शेंद्रे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. खजिनदार नितीन रोहिटे यांनी आभार मानले. समाजाचे कार्याध्यक्ष विठ्ठल साळुंके यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमास सर्वश्री पंडित वडतिले, अरुण साळुंके, ज्ञानेश्वर सुरवसे, रामचंद्र जतकर, नवनाथ सुरवसे, विष्णू साळुंके, लखन जतकर, बिरप्पा वडतिले योगेश वडतिले, शिवानंद वडतिले, मारुती साळुंके, देविदास कुकडे, आदित्य साळुंके, परमेश्वर वडतिले, श्रीनिवास सुरवसे, ऋतुजा वडतिले व रोहिणी वडतिले आदी समाजबांधव उपस्थित होते. तसेच महापालिकेतील मुख्य कार्यक्रमानंतर बुरुड समाजातील विविध संघटनांच्यावतीने पार्क चौक, विडी घरकुल, भवानी पेठ येथे संत बुरुड केतेश्वर महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला. समाज बांधवांनी रक्तदानात सहभाग नोंदवत महाप्रसादाचा लाभही भेटला.

# पार्क स्टेडियम पार्किंग येथील सर्कल पुन्हा बसविण्याचे काम सुरू

## मंडई विभागाने मोकाट जनावरेही घेतले ताब्यात

सुराज्य/सोलापूर

महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशानंतर पार्क स्टेडियम पार्किंग येथील सर्कल पुन्हा व्यवस्थित बसविण्याचे काम सोमवारी तत्काळ सुरू करण्यात आले आहे. मक्तेदार , महापालिका झोन आणि मंडई विभाग कामाला लागले आहेत. मंडई विभागाने ३ मोकाट जनावरही ताब्यात घेतले आहे.

सोलापूर शहरात मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पार्क स्टेडियमचे स्मार्ट सिटी योजनेतून कोट्यवधी रुपये खर्चून नूतनीकरण करण्यात आले आहे. मात्र, अर्धवट कामामुळे या परिसराला स्मार्ट लुक आलाच नाही. तुटलेले ग्रील बसवल्याने येथील सर्कलमध्ये मोकाट जनावरांचा वावर दिसून येतो. यामुळे हे सर्कल की गायीचा गोठा असा प्रश्न उपस्थित होत होता. परिसरात अस्वच्छता दिसून आली. यासंदर्भात दखल घेत महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी तत्काळ सबंधितांना कार्यवाहीचे आदेश दिले. आदेशानंतर यंत्रणा कामाला लागली.



सोमवारी सकाळीच पार्क स्टेडियम पार्किंग येथील स्टील ग्रील सर्कल पुन्हा व्यवस्थित बसविण्याचे काम सुरू करण्यात आले. महापालिका झोन कार्यालयामार्फत स्वच्छता करण्यात आली. तर परिसरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी महापालिका मंडई अंतर्गत गुरे वाहक विभागानेही पहाणी केली. मंडई विभागाने ३ मोकाट जनावरही ताब्यात घेतले आहे. कोंडवाड्यात पाठवण्यात आले.

**नावात बदल**

माझे जुने नाव **माहेजबीन शकील अहमद शेख** Mahejabeen Shakeel Ahmed Shaikh असे होते. आता बदलून नवीन नाव **महेजबीन शकील अहमद शेख** Mahejabin Shakeel Ahmed Shaikh असे झाले आहे. तरी मला आता वरील नवीन नावाने ओळखण्यात यावे.

१०९, सिध्देश्वर पेठ, सोलापूर.
ॲफिडेव्हीट रजि. नं. ९६०३३
दि. ०७.१२.२०२२

## मोहोळ तालुक्यात अवकाळी पाऊस

सुराज्य/चिखली

**सोमवारी सायंकाळी मोहोळ तालुक्यातील बहुतांश ग्रामीण भागात अवकाळी पावसाने मेघगर्जनेसह जोरदार हजेरी लावली. यामुळे फुलोऱ्यात आलेल्या ज्वारी पिकाचे मोठे नुकसान होणार आहे तर द्राक्ष उत्पादक सुध्दा घाबरले आहेत.**

गेल्या तीन ते चार दिवसापासून ढगाळ वातावरण निर्माण झाले असून सूर्यदर्शन देखील झाले नाही. त्यामुळे द्राक्ष, खरबूज, कलिंगड, काकडी, दोडका, टोमॅटो, घेवडा आदी पिकावर किडीचा प्रादुर्भाव होणार आहे. चालू खरीप हंगामात ज्वारीची पेरणी अत्यंत कमी प्रमाणात झाली आहे. जी झाली ती ही उशिरा त्यामुळे शेतकऱ्यांनी ज्वारीचे पीक चांगले आणले आहे. ज्या शेतकऱ्यांने आगाप पेरणी केली आहे, त्याची ज्वारी पोग्यातून बाहेर पडून फुलोऱ्यात आली आहे. पावसाच्या माराने फुलोरा झडला ज्वारीवर सुध्दा परिणाम होऊन काळी पडणार आहे, तसेच गहू पेरणी ही सुरू आहे . ज्यांनी अगोदर गव्हाची पेरणी केली आहे त्याला हा पाऊस फायदेशीर आहे. मात्र अनेकांनी कांदा लागवड केली आहे. कांदा पीक जोमात आले आहे, त्यांना मात्र पाऊस उघडला व धुके पडले तर कांदा पिकावर मोठ्या प्रमाणात करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

विशेष म्हणजे अनेक द्राक्ष बागा यंदा लवकर छाटल्या आहेत. त्या बागा आता फळ धारणेच्या प्रक्रियेत आहेत.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

| Sr. No. | RFx No. | Name of Work | Tender No. | Estimated Cost/EMD | Tender Fee | Work Completion Period | Date of Tender Submission | Date of Technical Bid Opening |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **7000025379** | Urgent miscellaneous civil maintenance works at EHV, Project Division-III office, **132kV S/S Navives**, Dist. Solapur | T-18/ 2022-23 | Rs. 8,12,626/- / Rs. 8,126.26 | Rs. 500/- + GST | 02 Months | 13.12.2022 (11:00 Hrs) up to 20.12.2022 (11:00 Hrs) | 20.12.2022 (12:00 Hrs) (If possible) |
| 2 | **7000025472** | Renovation and Maintenance work at **PAC Division-3** Office, MSETCL, Solapur | T-19/ 2022-23 | Rs. 22,52,011/- / Rs. 22,520.11 | Rs. 500/- + GST | 04 Months | 13.12.2022 (11:00 Hrs) up to 20.12.2022 (11:00 Hrs) | 20.12.2022 (12:00 Hrs) (If possible) |
| 3 | **7000025474** | Construction of retaining wall along with chainlink at **220 kV Malinagar** Substation, Dist. Solapur | T-20/ 2022-23 | Rs. 24,70,812/- / Rs. 24,708.12 | Rs. 500/- + GST | 04 Months | 13.12.2022 (11:00 Hrs) up to 20.12.2022 (11:00 Hrs) | 20.12.2022 (12:00 Hrs) (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Note :** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal (**https://srmetender.mahatransco.in**).

**Sd/-**
**Executive Engineer (Civil)**
**EHV, CCCM Division, Solapur**

# बेमोसमी पावसाच्या शक्यतेने शेतकरी धास्तावला; वातावरणातील बदलामुळे द्राक्षबागा धोक्यात

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात गेल्या दोन-तीन दिवसांपासून वातावरणात मोठा बदल झाला असून, पहाटेच्या सुमारास मोठ्या प्रमाणात दवबिंदू तसेच काही प्रमाणात धुके पडत आहे. तर काही ठिकाणी पावसाने हजेरी लावली आहे. त्याचा फटका द्राक्ष बागांना बसतो आहे.

काही ठिकाणी फुलोरावस्थेत असलेल्या बागातील फूलगळ होऊ लागली असल्याने द्राक्षबागायतदार शेतकरी धास्तावले असून जर अवकाळी पाऊस पडला तर शेतकऱ्यांवर अवकळा येण्याची शक्यता असल्याने द्राक्ष बागायतदार हवालदिल झाला आहे. सोलापूर जिल्ह्यात द्राक्षांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. यातून येणाऱ्या उत्पन्ना या भागातील शेतकऱ्यांचे आर्थिक गणित अवलंबून असते. सध्या अनेक भागात फळ तयार होण्याच्या टप्प्यामध्ये द्राक्ष बागा आहेत. तसेच काही ठिकाणी द्राक्षमणी तयार होण्यास सुरुवात झाली आहे. मात्र गेल्या दोन दिवसांत ढगाळ वातावरणामुळे द्राक्षावर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे.

काही भागात तर बागांवर रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे शेतकरी धास्तावले आहेत. या बदलत्या वातावरणामुळे अन्न निर्मितीची प्रक्रिया मंदावली आहे. त्यामुळे फुलोवस्थाचे गळ होऊ लागली आहे. काही ठिकाणी सकाळी दव पडत असल्याने फळ कुजींची समस्या होण्याची शक्यता आहे. हातातोंडाशी आलेले पीक जाऊ नये यासाठी शेतकऱ्यांची सकाळपासून द्राक्षावर फवारणी करण्यासाठी खटपट सुरू आहे. पुढील काही दिवस वातावरण असेच राहिले, तर डाऊनीसह इतर रोगांचा प्रादुर्भाव होण्याची भीती व्यक्त होत आहे. द्राक्ष बागांत सातत्याने कीडकनाशकांची फवारणी करावी लागते आहे. परिणामी, उत्पादन खर्चात वाढ होत असल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. उत्पादनापेक्षा खर्च जास्त होत असल्यामुळे द्राक्ष पीक यंदाच्या वर्षी तोट्यात जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## ■ 'अवकाळी' ने शेतकऱ्यांवर 'अवकाळा' येण्याची शक्यता?



■ **रोगट हवामानाचा फटका :** ढगाळ वातावरणामुळे द्राक्ष बागांवर डावणी, भुरी या रोगांचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. त्यातच विविध हवामान तज्ज्ञांनी पुढील आठवड्यात ११ ते १५ डिसेंबर या कालावधीत बेमोसमी पावसाचा अंदाज वर्तविला असल्याने शेतकरी धास्तावले आहेत. रब्बी हंगामातील पिके तसेच बागा वाचविण्यासाठी महागडी औषध फवारणी करताना दिसत आहे.

■ **बुरशीनाशक फवारणी खर्चात वाढ :** या वर्षी जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत पावसाने थैमान घातल्याने संपूर्ण खरीप हंगाम वाया गेला. मका, सोयाबीन, बाजरी ही खरिपातील पिके तसेच कांदा रोपे शेतात पाणी साचल्याने सडून गेली. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात द्राक्ष उत्पादन घेतले जाते.

■ **थंडी पुन्हा गायब :** पावसाने उघडीप दिल्यानंतर ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यांत छाटणी केलेल्या द्राक्ष बागांना गोड बहार येऊन मोठ्या प्रमाणात घड येण्यास प्रारंभ झाला आहे. मात्र, गेल्या आठ दिवसांपुर्वी सुरु झालेल्या थंडीने द्राक्ष बागांना भुरी रोगाचा फटका बसण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी बुरशीनाशके फवारणी करून रोग आटोक्यात आणले.



## उत्तर तालुक्यातील पाथरी येथे कीटकनाशक हाताळणी प्रात्यक्षिक

**उत्तर सोलापूर :** उतर तालुक्यातील पाथरी येथे लोकमंगल कृषींदुत प्रशिक नाटकर, ऋषिकेश मोरे, सागर सावंत, गणेश माने, आदेश पाटील, पवनकुमार मुंचीतला यांनी किट नाशकाची सुरक्षित फवारणी, हाताळणी बद्दल सविसर माहिती दिली. यामध्ये फवारणी करताना त्यामधील हानिकारक रसायनांच्या माहिती अभावामुळे अनेक शेतकऱ्यांना त्वचारोग, कॅन्सर यांसारखे रोग उद्भवतात, काही ठिकाणी शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागतो, कीटकनाशकांमध्ये असलेले हानिकारक रसायनांचा उपयोग, सेफ्टी किट याबाबत सविस्तर माहितीसह प्रात्यक्षिक करून दाखवले. यावेळी शेतकरी नागनाथ कोरे, अमोल गणेशकर, उद्धव बंडगर, शहाजी शेळके, मोनश्वर सुतार शिवाजी क्षीरसागर, अंकुश गावडे, मोहम्मद शेख उपस्थित होते. लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा प्राचार्य डॉ सचिन फुगे, कीटकशास्त्र विषयतज्ज्ञ प्रा रवींद्र पालकर यांचे मार्गदर्शन मिळत आहे.




## गणेश शिवाजी बोरकरची कुमार राष्ट्रीय खो-खो स्पर्धसाठी निवड

**वेळापूर :** रोहा अलिबाग येथे झालेल्या कुमार खो खो स्पर्धा मध्ये वेळापूर तालुका माळशिरस येथील अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ व इंग्लिश स्कूल वेळापूर प्रशालेचा खेळाडू गणेश शिवाजी बोरकर या खेळाडूची पश्चिम बंगाल येथे होणाऱ्या कुमार राष्ट्रीय स्पर्धा साठी निवड झाली आहे. या यशस्वी खेळाडूला खोखो राष्ट्रीय पंच जावेद मुलाणी, प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, इंग्लिश स्कूल वेळापूर चे मुख्याध्यापक आर बी पवार, इंग्लिश स्कूल क्रीडा प्रमुख सतीश कदम, भरत अर्वाड विजेता जावेद आतार, शिवाजी जाधव, पोलिस शहाजी मंडले, श्रीनाथ खटके, शिवाजी मंडले, भास्कर बागल, सत्यजित बारंगुळे, यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांचे दलित मित्र महाविद्यालय मंगळवेढा अध्यक्ष सुजित कदम, संस्था सचिव प्रियदर्शनी महाडिक, उपाध्यक्ष डॉ.सुभाष कदम, संस्थेच्या मार्गदर्शिका डॉ. मीनाताई कदम, संस्थेच्या संचालिका तेजस्विनी कदम, इंग्लिश स्कूल वेळापूर स्कूल कमिटीचे चेअरमन प्रतापराव पाटील, रिपाई माळशिरस तालुका अध्यक्ष व शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष मिलिंद सरतापे, मुख्याध्यापक पवार, उपमुख्याध्यापक सुनील खंदारे, पर्यवेक्षक शिवशरण पठान, वैभव बनसोडे, धनंजय शिवपुजे, अजित बनकर यांनी अभिनंदन केले आहे.



## माळीनगरमध्ये बौद्धाचार्याचे जनक यशवंत आंबेडकर जयंती साजरी

**माळीनगर :** चैत्यभूमीचे शिल्पकार बौध्दाचार्या चे जनक यशवंत तथा भैय्यासाहेब भिमराव आंबेडकर यांची ११० वी जयंती यशवंत बुध्द विहार संस्थेच्या वतीने साजरी करण्यात आली. त्यांनी स्वतःच कष्टातून जिवण उभे केले भारतीय बोध्द महासभा 'रिपब्लिकन पक्ष' पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुन्सिपल कामगार संघ पंचायत समिती महाराष्ट्र विधिमंडळ आणि त्याकाळची राजकारण यावर त्यांनी आपला स्वतंत्र ठसा उमटवला बुध्दभूषण प्रिंटींग प्रेसचे व्यवस्थापन पक्षाचे मुखपत्र आणि धम्म यांसारखे धार्मिक नियतकालिके ही त्यांच्या इच्छाशक्तीची जिती जागतिक उदाहरणे आहेत भैय्यासाहेबांनी स्वतःच्या आयुष्य स्वतः घडविले बौध्दांच्या सवलतीसाठी चळवळ निर्माण केली. महू मध्य प्रदेश ते मुंबई लॉंग मार्च काढून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक चैत्यभूमी निर्माण केले. यावेळी प्रथम बाबासाहेब यांच्या प्रतिमेस भोसले पांडूरंग यांनी तर भैय्यासाहेब यांच्या प्रतिमेस पं.सं.सदस्या सुशांता जगताप यांनी पुष्पहार अर्पण केले. अजित नाईकनवरे याच्या हस्ते लहान मुलास खाऊ वाटप करण्यात आले. जयश्री नाईकनवरे, सोपान चंदनशिवे मुरलीधर जगताप, कांबळे' संजय जाधव आदी उपस्थित होते.



## सुर्वे वस्तीवर दत्तजयंती उत्साहात साजरी

**मोडनिंब :** मोडनिंब येथील पालखी मार्गावरील गंगखोरी, सुर्वे वस्ती येथील दत्त मंदिरात दत्त जन्मोत्सव सोहळयाचे व अखंड हरिनाम सप्ताह साजरा करण्यात आला .यामधे कार्यक्रमात मंगळवारी सात डिसेंबर रोजी दत्त अभिषेक, हरिपाठ व सायंकाळी सात वाजता युवा किर्तनकार हभप निरंजन महाराज सुर्वे यांचे सुश्राव्य असी किर्तनसेवा संपन्न झाली. बुधवारी सात डिसेंबर रोजी हभप आदिनाथ महाराज खोसे आळंदी यांचे दत्तात्रय अवतार व त्यांच्या विविध प्रकारच्या कार्याची ओळख असलेले सती अनुसुया,अत्री ऋषी, व त्रिदेव अवतार कथा निरुपण करण्यात आले. यावेळी दत्त जन्मावर पाळणा गायण करण्यात आले. फुले टाकून दत्त जन्माचे स्वागत करण्यात आले. यामध्ये मृदंगसाथ हभप शुभम महाराज शिंपणकर,हभप अभिषेक महाराज खोसे, हभप सिध्देश्वर महाराज गावडे, हभप ओम महाराज गागरे तर गायनसाथ हभप शुभम महाराज जांभळे, आनंद महाराज जांभळे यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी हभप सारंग महाराज, हभप निलेश नाझरे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीपाद बाबा साधक मंडळाचे साधक व टाळकरी व शुभम कंन्स्ट्रकशनचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी दोन दिवस भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## चिखली गावची ग्रामसभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

सुराज्य/मोहोळ



सरपंच बाळू मेंढे ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. मागील सभेपासून आजपर्यंत झालेल्या खाते निहाय जमा खर्च ग्रामविकास अधिकारी माधुरी वसेकर यांनी वाचून दाखविला.

सभेत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तींचा विकास करणे, १५ वित्त आयोग २०२०-२१ मधील शिल्लक असलेली कामे, पंधरा वित्त आयोग सन २०२१-२२ व २२-२३ मधील कामांचा आढावा घेण्यात आला तसेच २०२३-२४ सालचा आराखडा तयार करण्यात आला.

विधवा एकल महिला सर्वेक्षण, प्रधानमंत्री रमाई आवास योजना जागा नसलले लाभार्थी, यादव घर ते मोरे घर रस्ता, जन सुविधा अंतर्गत नवीन स्मशानभूमी सुसुभी करणे प्रस्तावास मान्यता देणे, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे, अंतर्गत कामांना मंजुरी देणे, मतदानकार्ड आधारकार्डशी लिंक करणे पुर्ण, घरपट्टी पाणीपट्टी व इतर थकबाकीदार नोटीस बजावणे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस लोकवर्गणीतून रंगकाम करणे, गावातील सर्व शासकीय जागेची जमिनीची नोंद सातबारावर घेऊन शासन किंवा ग्रामपंचायतीच्या नावे करणे, गाव तलाव, रस्ते महाराजस्व अभियान, आरो प्लांट दुरुस्ती करणे आणि चालू करणे, गावातील सर्व अतिक्रमण काढणे, डासांची फवारणी या विषयावर चर्चा झाली. ग्रामसभेस उपसरपंच सुनंदा दत्तात्रय माळी, राजाराम सिरसट, पल्लवी बाळू शिंदे, मंगल पांडुरंग सिरसट, नानासाहेब मते, सज्जन वाघमोडे, प्रकाश मते, महेश सिरसट, धनाजी शिंदे, अंगणवाडी सेविका सुनिता जगताप, अंगणवाडी मदतनीस हर्षा मते, ग्रामपंचायत कर्मचारी दत्तात्रय चौधरी, संतोष सिरसट, कृषी सहायक शेंडगे, हणमंत चौधरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## मंगळवेढ्याच्या इंग्लिश कॉलेजमध्ये राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धा

**मंगळवेढा :** १७ व १८ डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र डॉजबॉल असोशियन व इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज, मंगळवेढा संयुक्तरित्या डे- नाईट राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धेचे आयोजन शिक्षण प्रसारक मंडळ मंगळवेढाचे अध्यक्ष अँड.सुजित कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले आहे.

यामध्ये मुलांचे ३० संघ व मुलींच्या २० संघाने यामध्ये सहभाग नोंदविला आहे. या अजिंक्यपद स्पर्धेतून दिनांक २७ते २८डिसेंबर २०२२ दरम्यान पानिपत हरियाणा येथे होणाऱ्या सीनियर राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या संघाची निवड केली जाईल. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशनचे महासचिव डॉ. हनुमंतराव लुंगे, शिक्षण प्रसारक मंडळ मंगळवेढ्याच्या संचालिका तथा उपप्राचार्य तेजस्विनी कदम, इंग्लिश स्कूल जुनियर कॉलेजचे प्राचार्य रवींद्र काशीद, उपमुख्याध्यापक सुनील नागणे, पर्यवेक्षक राजू काझी, दिलीप चंदनशिवे, सुहास माने, सोलापूर जिल्हा सेक्रेटरी सुदेश मालप, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. दीपक शिनगारे, अमित जावळे, धनंजय यादव, अण्णा वाकडे, फिरोज पठाण हे प्रयत्नशील आहेत.

## पिलीव परीसरात लंपीचा वाढता प्रादुर्भाव; पशुपालक चिंतेत

सुराज्य/पिलीव



माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात गेल्या काही दिवसापासून जनावरांना मोठ्या प्रमाणावर लंपीचा प्रादुर्भाव होत आहे यामुळे सध्या पशुपालकांमध्ये प्रचंड भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. पिलीव येथील पशुवैद्यकिय दवाखान्या अंतर्गत पिलीव, झिंजेवस्ती, सुळेवाडी हया तिन गावांचा समावेश होतो.

या तिन्ही गावात ५५०० च्या आसपास पशुधन आहे. पिलीव परिसरात देशी खिलार गाई, बैल, जरशी गाई यांना सहजासहजी लंपीचा प्रादुर्भाव होत असल्याचे चित्र आहे. याठिकाणी तिन्ही गावासाठी एकच पशुवैद्यकिय अधिकारी आहेत यामुळे त्यांच्या वर कामाचा मोठा ताण आहे. याठिकाणी सहा जागा रिक्त आहेत त्यामुळे एकटया पशुवैद्यकिय अधिकारी यांच्यावर मोठा ताण आहे. तिन गावापैकि पिलीव गावात सध्या लंपीचा प्रादुर्भाव मोठा आहे. तसेच पिलीव परीसरात जनावरे लंपीमुळे दगावत आहेत.खरे तर या आजारावर उपचार करण्यासाठी तज्ञ व अनुभवी डॉक्टराकडुन उपचार करणे आवश्यक असताना खाजगी कसलाही अनुभव नसणारे एल एल एस चा डिप्लोमा झालेले डाक्टर लंपी रोगाच्या काळात महागडी औषधे देऊन शेतकऱ्यांना अक्षरशः लुटत आहेत.

लंपीचा रोगाची पिलीव परीसरातील निश्चित आकडेवारी समजुन घेण्यासाठी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.शेंडगे यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.

त्यांना कसलाही अनुभव नसताना ते औषधोपचार करीत आहेत व आर्थिक लुट करीत असल्याचे चित्र सध्या पिलीव परीसरात आहे.

## अक्कलकोट केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया तातडीने राबवण्याची मागणी

सुराज्य/अक्कलकोट



केंद्रप्रमुख हे पर्यवेक्षीय यंत्रणेतील महत्त्वपूर्ण तसेच गुणवत्ता तपासणीची,वाढीसाठी प्रयत्नरत असणारे जबाबदारीचे पद आहे.सोलापूर जिल्ह्यात केंद्रप्रमुख पदाची जवळपास १९९ पदे मंजूर असून फक्त २४ पदेच कार्यरत असल्याने पर्यवेक्षीय यंत्रणेतील मोठ्या प्रमाणातील रिक्त पदांमुळे शिक्षक संवर्गातील सहशिक्षकांवर जबाबदारीचा अतिरिक्त भार टाकण्यात आला आहे.त्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता व प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे.

या सर्व बाबी विचारात घेऊन केंद्रप्रमुख पदोन्नतीच्या प्रक्रिया तातडीने राबविण्याची मागणी सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अनिल कादे यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील आणि शिक्षणाधिकारी(प्राथ.) संजय जावीर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली. शैक्षणिक दर्जा चांगला असावा, यासाठी जिल्हा परिषदेतील सर्व केंद्रप्रमुख पदे भरणे गरजेचे आहे.यापूर्वीच्या भरती पद्धतीने हे शक्य होत नसल्याने शासनाने ०१ डिसेंबर २०२२ रोजी शासननिर्णयाद्वारे आता केंद्रप्रमुख पदे ५० टक्के पदोन्नतीने व ५० टक्के पदे विभागीय परीक्षेद्वारे भरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेला पदोन्नतीने जवळपास ७६ केंद्रप्रमुख मिळणार आहे. विद्यार्थी गुणवत्तेच्या दृष्टीने केंद्रप्रमुख पदोन्नती गरजेची असून ती तातडीने राबविण्याची आग्रही भूमिका जिल्हाध्यक्ष अनिल कादे यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील आणि शिक्षणाधिकारी(प्राथ) संजय जावीर यांच्यासमोर मांडली. यावेळी केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया तातडीने माहिती संकलनाची पूर्तता करून राबविण्याची ग्वाही प्रशासनाच्या वतीने दिल्याची माहिती जिल्हाध्यक्ष अनिल कादे यांनी दिली.

## उपविभागीय अधिकाऱ्यासाठी मुख्यमंत्र्यांना निवेदन

सुराज्य/नातेपुते

माळशिरस तालुक्यासाठी कायमस्वरूपी उपविभागीय अधिकारी मिळावा यासाठी बाळासाहेबांची शिवसेना तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी रविवार दि.११ डिसेंबर रोजी सोलापूर येथे गुरव समाजाच्या मेळाव्या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले.

तालुक्यामध्ये कायमस्वरूपी उपविभागीय अधिकारी नसल्यामुळे विद्यार्थ्यांना भरती प्रक्रियेसाठी लागणारे कागदपत्रे तसेच दाखल्यांचा प्रश्न निर्माण होत आहे. पालखी मार्गातील भूसंपादनाचे निर्माण झालेले शेतकऱ्यांचे प्रश्न माळशिरस तालुक्यातील नागरिकांचे अनेक प्रश्न माळशिरस तालुक्याला कायमस्वरूपी उपविभागीय अधिकारी नसल्याने अनेक कामे व केसेस खोळंबून राहिली आहेत. त्यामुळे त्याचे गांभीर्य समजून माळशिरस तालुक्याला कायमस्वरूपी उपविभागीय अधिकारी मिळावा असे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले.यावेळी जिल्हा संपर्क प्रमुख शिवाजीराव सावंत, जिल्हा अध्यक्ष महेश चिवटे, चरणराज चवरे, अमोलबापू शिंदे, मनिष काळजे, जाविद मुलाणी, दादा मुलाणी, पोपट शिंदे उपस्थित होते

## बोबडे वकिल यांचे स्मारक होणे गरजेचे : खा.नाईक निंबाळकर

सुराज्य/टेंभूर्णी



स्वर्गीय बोबडे वकील म्हणजे वचनाप्रमाणे प्रामाणिक आणि सज्जन, सारस व्यक्तिमत्व होते , सर्वसामान्य माणसाला घडविणारे ते राजकारणातील परीस होते , टेंभुर्णीचा विकास करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्यासारखा लढवय्या कार्यकर्ता मी आजपर्यंत पाहिला नाही, त्यांचं शत्रुत्व कोणाबरोबरही आलं नाही, एक अजातशत्रू नेता, शेवटच्या क्षणापर्यंत लढणारा नेता म्हणून त्यांची संपूर्ण जिल्ह्यात ओळख होती, असे प्रतिपादन माढा लोकसभेचे खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांनी केले.

स्वर्गीय कृष्णात बोबडे यांच्या द्वितीय स्मृतीदिनाच्या निमित्ताने समाजकारणातील एक राजहंस.. वकील साहेब या स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा तसेच ' टेंभुर्णी भूषण ' पुरस्कार वितरण

सोहळा शनिवारी १० डिसेंबर रोजी सायंकाळी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली व करमाळा तालुक्याचे आमदार संजयमामा शिंदे, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी आयोजित कार्यक्रमात खासदार निंबाळकर बोलत होते. आमदार संजयमामा शिंदे म्हणाले की, राजकारणात असताना कसं वागावं याचं आदर्श उदाहरण म्हणजे बोबडे दादा होते , पाण्यासारखा नितळ, मितभाषी व सदाहर्षित असा स्वभाव त्यांचा होता. प्रामाणिक मनाचा एक आदर्श समाजकारणातील राजहंस असणार्या बोबडे वकील यांच्या स्मरणार्थ दिले जाणारे पुरस्कार प्रोत्साहन देणारे ठरतील. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील म्हणाले की , तरुणांना राजकारणात काम करताना प्रेरणा आणि स्फुर्ती बोबडे वकील यांच्या स्मरणिकेतुन मिळते , त्यांचा वारसा पुढे नेण्याचे काम योगेश बोबडे करत आहेत. विकासाची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी बोबडे यांच्या पाठीशी राहणार आहे.

यावेळी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार संजयमामा शिंदे, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह शिंदे, शिवसेनेचे माढा लोकसभा संपर्कप्रमुख संजय कोकाटे, भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, माजी सभापती शिवाजीराजे कांबळे, जिल्हा परिषद माजी सभापती संजय पाटील भिमानगरकर, रयत क्रांती संघटनेचे सुहास पाटील, कन्हेरगांव सोसायटीचे चेअरमन लिंबाजी मोरे, टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर, मोहन बोबडे, विजय तांबीले, डॉ.एम.पी.मोरे, ऋषिकेश बोबडे, नागेश बोबडे, अनुराधा बोबडे, सुरजा बोबडे, शिरीष पाटील, रुपेश बोबडे, राजाभाऊ जगदाळे, अर्जुन बागल, माजी सरपंच राजाभाऊ खटके, करमाळा भाजपचे अध्यक्ष गणेश चिवटे आदी उपस्थित होते. यावेळी टेंभुर्णी भूषण पुरस्काराने व्यवसाय - बाळासाहेब लक्ष्मण देशमुख, सामाजिक - शीलाताई भारत पाटील, व्यापार - शशिकला विजयकुमार व्होरा, उद्योग - दीपक नामदेव मोहित, क्रीडा - रोहिदास सुरेश वाघमारे, प्रा.रवि कुनाळे यांना खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार संजयमामा शिंदे, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, संजय कोकाटे यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिवसेनेचे संजय कोकाटे म्हणाले की, बोबडे वकील साहेबांच्या कडूनच राजकारणाचे धडे शिकलो, अखेरचा श्वास घेईपर्यंत ते मोहीते पाटील यांच्या पाठीशी उभे राहिले. राजकारणात मागितल्याशिवाय काय मिळत नाही. त्यांचासारखा माणूस होणे नाही. प्रास्ताविक भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे यांनी केले. बोबडे वकील साहेबांच्या पोटी जन्माला आलो व त्यांचा वारसा पुढे चालविणे ची संधी मिळणे हे आमचे भाग्य आहे, त्यांच्यानंतर आमच्याकडे जबाबदारी आली असून त्यांना साजेशे असे कार्य सार्थ करुन दाखवेन. यावेळी विठ्ठल पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय पाटील भिमानगरकर यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचलन श्वेता हुल्ले, राजेंद्र मुळे, राजु पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन ऋषिकेश उर्फ बंटीनांना बोबडे यांनी केले.

# सुनक यांच्या विरोधात स्वकियांचेच बंड

सुराज्य/नवी दिल्ली

ब्रिटनचे भारतीय वंशाचे पंतप्रधान ऋषी सुनक यांना स्वपक्षीयांकडून विरोध सहन करावा लागत असल्याच्या बातम्या समोर येत आहे. सत्ताधारी हुजूर पक्षातून सुनक यांना करविषयक धोरणांमुळे विरोध होताना दिसत आहे. सुनक सरकारच्या अर्थसंकल्पामधील करविषय धोरणांना सत्ताधारी पक्षाकडूनच विरोध होताना दिसतोय. सुनक यांनी सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर काही महिन्यांमध्येच पक्षांतर्गत मतभेद समोर आले आहेत.



**सहा आठवड्यांमध्येच विरोध**

सत्तेमध्ये येऊन सहा आठवडे झालेल्या सुनक यांच्यासमोर अनेक आर्थिक आव्हानं आहेत. यामध्ये प्रामुख्याने वाढती वीज बिलं, दैनंदिन जीवनातील मूलभूत गोष्टींच्या वाढलेल्या किमती यासारख्या समस्या समोर असतानाच आता स्वपक्षीय नेत्यांकडून सुनक यांच्यावर करकपातीसाठी दबाव आणला जात आहे.

**जनतेमध्ये विश्वास निर्माण करण्याची गरज**

सत्ताधारी हुजूर पक्षाच्या ४० खासदारांनी देशाचे अर्थमंत्री जर्मे हंट यांना रविवारी एक पत्र लिहिले आहे. सरकार ब्रिटिश नागरिकांवर अशा पद्धतीने कर लादण्याचा विचार करत आहे जो दुसऱ्या महायुद्धानंतर आतापर्यंत कधीही पाहण्यात आला नव्हता, असे पत्रामध्ये या खासदारांनी म्हटले आहे. आपण आपल्या मतदारांमध्ये विश्वास निर्माण केला पाहिजे जे दैनंदिन वस्तूंच्या महागाईसंदर्भात चिंतेत आहेत. करदात्यांचा प्रत्येक पैसा हा त्यांच्यावतीने पूर्णपणे उपयोगाच्या ठिकाणीच वापरला जातोय आणि तो वायफळ खर्च केला जात नाही असा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण करणे गरजेचे आहे, असे या खासदारांनी म्हटले आहे.

**अहवाल प्रसिद्ध करणार**

या ४० खासदारांच्या गटाने स्वत:ला 'कन्झर्व्हेटीव्ह वे फॉरवर्ड' असे म्हटले आहे. या गटाने आपण एक अहवाल सोमवारी प्रसिद्ध करणार असल्याचे म्हटले असून सात बिलियन पौंडस् वायफळ घालवले आहेत असे म्हटले आहे. हे पैसे वापरून सरकारला करकपात करता येईल किंवा हे पैसे पहिल्या फळीतील सेवांसाठी वापरले जावेत, असे या खासदारांचे म्हणणे असल्याचे 'रॉयटर्स'च्या वृत्तात नमूद केले आहे.

**प्रीती पटेल यांचा पाठिंबा**

माजी गृहमंत्री प्रीती पटेल यांचा पाठिंबा या गटाला आहे. या गटाने असेही म्हटले आहे की, 'सदस्यांनी ट्रस यांना मते दिल्याच्या काही आठवड्यांनंतर ऋषी सुनक यांची निवड झाल्याने शेवटी हुजूर पक्षामधील लोकशाहीवरील आमचा विश्वास उडाला आहे.

**ट्रस यांच्या पावलावर सुनक यांचे पाऊल**

सुनक यांनी आधीच अनेक धोरणात्मक निर्णयांमध्ये बदल केले आहेत. हे बदल लिझ ट्रस यांनी ज्याप्रकारे धोरणे राबवली होती, त्याचप्रकारचे असल्याचे सांगितले जात आहे. ट्रस यांची करकपातीची निधी नसलेली योजना आणि महागडी वीज देयक हमी यामुळे बाजार कोसळल्यानंतर ब्रिटनची आंतरराष्ट्रीय आर्थिक विश्वासार्हता गमावली होती. तसाच प्रकार पुन्हा होण्याची भीती या खासदारांना आहे. सुनक हे ब्रिटनचे गेल्या चार वर्षांतले पाचवे पंतप्रधान आहेत. मात्र, त्यांचीही पुढील वाटचाल सध्याची स्थिती पाहता अवघड दिसत आहे.

पंतप्रधान होतानाच सुनक म्हणाले की, 'आर्थिक स्थैर्य आणि आत्मविश्वास या दोन गोष्टी मी माझ्या सरकारच्या अजेंड्याच्या केंद्रस्थानी ठेवीन. याचा अर्थ भविष्यातील काही निर्णय कठीण असतील, असे सुनक यांनी पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर स्पष्ट केले होते. आता सुनक हे बंड कसे मोडून काढतात याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.'

**सत्ताधाऱ्यांसाठी डे-जा-व्हू**

सत्ताधारी हुजूर पक्षासाठी हे सारे प्रकरण म्हणजे डे-जा-व्हू म्हणजेच तोच तोच प्रकार पुन्हा घडण्यासारखा आहे. यापूर्वी माजी पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्याविरोधात सुनक यांच्या नेतृत्वाखाली अशाप्रकारे अनेक खासदार, मंत्र्यांनी राजीनामा दिला होता. यानंतर जॉन्सन यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर झालेल्या निवडणुकीमध्ये लिझ ट्रस पंतप्रधान झाल्या होत्या.

मात्र, अल्पकाळ पंतप्रधान राहिल्यानंतर सुनक यांची पंतप्रधानपदी निवड करण्यात आली. मात्र, आता सुनक यांच्याविरोधात बंड पुकारण्यात आल्याने ते ही परिस्थिती कशी हाताळतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



## तालिबान्यांकडून अंदाधुंद गोळीबार; सहा पाकिस्तानी नागरिकांचा मृत्यू

सुराज्य/नवी दिल्ली

अफगाणिस्तान मधील तालिबानी सैनिकांनी पाकिस्तान सीमेवर केलेल्या अंदाधुंद गोळीबारात सहा पाकिस्तानी नागरिकांचा मृत्यू तर १७ जण जखमी झाले आहेत. बलोच प्रांतातील चमन सीमेवर चौकी उभारण्यावरून झालेल्या वादातून ही घटना घडली. दरम्यान, याबाबत पाकिस्तान सैन्याकडून निवेदन जारी करण्यात आले असून कोणतेही कारण नसताना अफगाणिस्तानकडून गोळीबार करण्यात आल्याचा आरोप पाकिस्तानने केला आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, अफगाणिस्तान सैन्याकडून बलोच प्रांतातील चमन सीमेवर चौकी उभारण्यात येत होती. मात्र, त्याला पाकिस्तानी सैन्याने विरोध केला. यावरून दोन्ही सैन्यांमध्ये वाद झाला. त्यानंतर अफगाणिस्तानच्या सैनिकांनी पाकिस्तानच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार सुरू केला. या गोळीबारात सहा पाकिस्तानी नागरिकांचा मृत्यू झाला आहे, तर १७ जण जखमी झाले.

## राजकारणात संयम महत्त्वाचा : पंकजा मुंडे

### छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख करत पंकजा मुंडे यांनी सुनावले

सुराज्य/मुंबई



'एखादी व्यक्ती चांगल्या भावनेने बोलते, तेव्हा एखादा शब्द वर खाली जाण्याची वाट पाहून बोभाटा करणे हादेखील महापुरुषाचा अवमान करणेच आहे, असे भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. राजकारणात संयम महत्त्वाचा असतो असेही त्यांनी सांगितले. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त पंकजा मुंडे यांनी गोपीनाथ गडावरुन कार्यकर्त्यांशी ऑनलाइन संवाद साधला. यावेळी वडिलांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांना गहिवरुन आले होतं. तसेच आपण आज मौन का बाळगले होते याचा खुलासा करत वादग्रस्त विधाने करणाऱ्यांवर टीका केली.

आज मी का मौन बाळगलं असा प्रश्न सर्वांना पडला असेल. जिथे कोणीही बोलण्याची हिंमत करत नाही, तिथे हिंमतीने बोलतो तोच खरा नेता असतो आणि जिथे सगळेच बोलत आहेत, कोणीच थांबत नाही, श्रेयवादाची लढाई सुरु आहे अशा स्थितीत मौन बाळगतो तोच खरा नेता असतो. हे गोपीनाथ मुंडे यांचे संस्कार आहेत. गेल्या दिवसांतील काही घटनांच्या निषेधार्थ मौन होते. कोणी व्यक्ती नव्हे तर प्रवृत्तीच्या विरोधात हे मौन होते, असे पंकजा मुंडे यांनी यावेळी सांगितले.

राजकारणात संयम महत्त्वाचा असतो. हे संयम आम्हांला आहे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. पुढे त्यांनी म्हटले की जसे टाळ वाजवण्यासाठी लय आणि नियम आहे तसेच राज्य आणि देश चालवण्यासाठीही नियम असतात. सत्ताधारी आणि विरोधकांसाठी नियम आहे, असेही त्यांनी सांगितले.



## सीमावाद प्रकरण : अमित शहा यांनी दोन्ही राज्यांची बोलावली बैठक

सुराज्य/नवी दिल्ली

महाराष्ट्र - कर्नाटक सीमावादावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मध्यस्थी केल्याचे पाहायला मिळत आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाप्रकरणी दोन्ही राज्यांची मंगळवारी अमित शाहांनी बैठक बोलावल्याची माहिती कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी दिली. त्यामुळे अमित शाह याप्रकरणी काय निर्णय घेणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

महाराष्ट्र - कर्नाटक सीमावादावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मध्यस्थी करणार असल्याची माहिती याआधी राष्ट्रवादीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनीही दिली होती.

महाविकास आघाडीच्या खासदारांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांची अमित शाहांकडे तक्रार केली होती. याची गंभीर दखल अमित शाहांनी घेतल्याची माहिती डॉ. अमोल कोल्हे यांनी दिली. त्यानुसार, १४ डिसेंबरला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्यासोबत अमित शाह एकत्र चर्चा करणार असल्याचे कोल्हे यांनी सांगितले होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्र कर्नाटक सीमावादाचे प्रकरण सुप्रीम कोर्टात प्रलंबित असताना कर्नाटक सरकारने जी अरेरावीची भाषा केली आहे, अडेलतट्टूपणा सुरु केला आहे, त्याविषयी चर्चा केल्याचे अमोल कोल्हे यांनी सांगितले.

## भूपेंद्र पटेल यांनी दुसऱ्यांदा घेतली मुख्यमंत्रिपदाची शपथ



सुराज्य/गांधीनगर : भूपेंद्र पटेल यांनी सोमवारी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची सलग दुसऱ्यांदा शपथ घेतली. ते गुजरातचे १८ वे मुख्यमंत्री ठरले आहेत. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. गांधीनगर येथील नवीन सचिवालयाजवळील हेलिपॅड मैदानावर हा शपथविधी सोहळा झाला.

गुजरात विधासनभा निवडणुकीत भाजपाला दणदणीत विजय मिळाला. १८२ पैकी १५६ जागांवर विजय मिळवल्याने भाजपाला ऐतिहासिक विजय प्राप्त केला आहे. त्यामुळे दिल्ली, हिमाचल प्रदेशची सत्ता गेल्यानंतरही गुजरातच्या विजयावर भाजपाला समाधान मिळाले आहे. या शपथविधी सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, उत्तर प्रदेशचे योगी आदित्यनाथ, कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई, नागालँडचे मुख्यमंत्री नेफियू रिओ, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान, आसामचे मुख्यमंत्री एच.बी.सरमा, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक साहा उपस्थित होते.

## कोल्हापूरमधील पाच तालुक्यांसाठी 'यलो' अलर्ट

सुराज्य/कोल्हापूर

कोल्हापूर शहराच्या काही भागांसह जिल्ह्यातील पाच तालुक्यांमध्ये अवकाळी पावसाने रविवारी रात्री हजेरी लावली.

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या मंदोस चक्रीवादळामुळे पावसाने हजेरी लावली होती. परंतु, या अवकाळी पावसानंतर पाराही घसरला असून वातावरणात थंडी जाणवत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंदोस वादळाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूरसह प. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यामध्ये पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. काही भागांत विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता असल्याने प्रशासनाला सूचना दिल्या आहेत.

## भरदिवसा एमएसएफच्या जवानावर गोळीबार



सुराज्य/नागपूर : कन्हान पोलीस स्टेशन हद्दीतील खाण क्रमांक सहा परिसरात झालेल्या बेछूट गोळीबारात महाराष्ट्र सुरक्षा दलाचा (एमएसएफ) जवान जखमी झाला झाला. ही घटना रविवारी दु. ३.३० वाजता घडली. या घटनेने ग्रामीण पोलिसांमध्ये खळबळ उडाली आहे. मिलिंद समाधान खोब्रागडे (वय २९, मूळ रा. अकोला) असे जखमी जवानाचे नाव आहे.

मिलिंद यांच्यावर कामठीतील खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. याप्रकरणात पोलिसांनी समीर सिद्दीकी (वय २९, रा. कॉलरी टेकडी) व राहुल जेकब (वय २६, रा. कांद्री) या दोघांना अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, महिनाभरापूर्वी समीर व वेकोलिच्या इंदर कॉलनी परिसरात तैनात एका जवानाचा वाद झाला होता. रविवारी दुपारी मिलिंद हे परिसरात गस्त घालत होते. समीर व जेकब मोटारसायकलने या भागात संशयास्पदस्थितीत फिरताना मिलिंद यांना दिसले. दोघांनी मिलिंद यांच्यासोबत वाद घातला. वाद विकोपाला जाताच समीरने पिस्तुलातून मिलिंद यांच्यावर बेछूट गोळीबार केला.

## ट्रेकर सोमनाथ शिंदेचे 'ते' शब्द दुर्दैवाने खरे ठरले

सुराज्य/पुणे : मुळशी आणि मावळ तालुक्याच्या सीमेवर असणाऱ्या तैल-बैला सुळक्यावर रॅपलिंग ट्रेक करत असताना सोमनाथ बळीराम शिंदे (वय २५) या तरुणाचा मृत्यू झाला आहे. सोमनाथ नेहमीप्रमाणे रॅपलिंग करत असताना त्याचा दोर तुटला आणि तो थेट २०० फूट खोल दरीत जाऊन कोसळला. रविवारी ही दुर्घटना घडली. सोमनाथ हा गेल्या अनेक वर्षांपासून ट्रेकिंग आणि रॅपलिंग करत होता. ट्रेकिंग करणारे अनेकजण त्याला ओळखत होते. त्याच्या दुर्दैवी मृत्यूमुळे हे सर्वजण हळहळ व्यक्त करत आहेत.

## एकाच दिवशी बिबट्याची दोघींवर झडप

सुराज्य/नाशिक

शहरालगतच्या शेतमळ्यांमध्ये बिबट्यांचे हल्ले सुरूच असून, निवारी सायंकाळी नाशिक आणि सिन्नर तालुक्यात बिबट्याने दोघींवर झडप घातली. सिन्नरच्या हल्ल्यात नऊ वर्षीय बालिका तर नाशिकच्या हल्ल्यात वृद्ध महिला जखमी झाली.

जखमी झालेल्या दोघींची प्रकृती स्थिर असली, तरी या घटनामुळे परिसरात दहशत पसरली असून, वन विभागाने जखमींना वैद्यकीय मदत पुरवून घटनास्थळी पिंजरे लावण्याची तयारी केली आहे. शनिवारी सायं. साडे सात वाजेच्या सुमारास सिन्नर तालुक्यातील सोनगिरी येथून बापलेक दुचाकीवरून जात असताना पाटाजवळ दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्या दुचाकीवर झडप घातली.

## ...तर राष्ट्रवादी पक्ष पहिल्या क्रमांकावर येईल : पवार

सुराज्य/मुंबई

'आपणे नेहमे असे आणि तसे काम झाले पाहिजे सांगतो. पण प्रत्येक नेत्याने आपल्या स्वत:च्या जिल्ह्यामधून आमदार करताना स्वत:बरोबर काही आमदार निवडून आणण्याचा प्रयत्न करावा, असे केल्या आपण राज्यात राष्ट्रवादीचा पक्ष पहिल्या क्रमांकावर येईल, असा सल्ला विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिला. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना संबोधित केले.'



राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचा आज ८३वा वाढदिवस आहे.

शरद पवारांच्या वाढदिवसानिमित्त यशवंतराव चव्हाण सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अजित पवारांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना कानमंत्र दिला. माझे शरद पवार यांना सांगणे आहे की, 'शरद पवार साहेब तुम्ही ८३व्या वर्षात पदार्पण करत आहात.

आपणे नेहमे असे आणि तसे काम झाले पाहिजे सांगतो. पण प्रत्येक नेत्याने आपल्या स्वत:च्या जिल्ह्यामधून आमदार करताना स्वत:बरोबर काही आमदार निवडून आणण्याचा प्रयत्न करावा, असे केल्या आपण राज्यात राष्ट्रवादीचा पक्ष पहिल्या क्रमांकावर जाईल. नाशिक पुणे आणि बीड जिल्हा यामधून अपवादात्मक आहे. कारण त्या ठिकाणी परिस्थिती योग्य आहे. पण इतर जिल्ह्यातील नेतेमंडळी तुम्ही कार्यकर्त्यांना चांगले मार्गदर्शन करता. पण तुमच्या स्वत:च्या जिल्ह्यात तुमच्याशिवाय दुसरा कोणी निवडून येतच नाही.

मी खरंय ते बोलतो कारण महाराष्ट्रात माझी खरं बोलणारा कार्यकर्ता म्हणून ओळख आहे. त्यामुळे आपण मार्गदर्शन करणे गरजेचे आहे, असे अजित पवार यांनी सांगितले.

# महापारेषणच्या राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेत भू-भू नाटक प्रथम

## मंगेश कुलकर्णीला उत्कृष्ट अभिनय आणि हर्षदा वाघमारेला उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार

सुराज्य/कराड

**महापारेषणच्या कराड परिमंडलाने आयोजिलेल्या आंतर परिमंडलीय नाट्यस्पर्धेत वाशी परिमंडलाच्या भू-भू या नाटकाने प्रथम क्रमांक तर व्दितीय क्रमांक सांघिक कार्यालय, मुंबईच्या 'द आऊट बर्स्ट' या नाटकाने पटकावला. वाशी परिमंडलाचे मंगेश कुलकर्णी उत्कृष्ट अभिनेता आणि हर्षदा वाघमारेला उत्कृष्ट अभिनेत्री पुरस्काराने गौरविण्यात आले.**

कराड (जि. सातारा) येथील यशवंतराव चव्हाण स्मृतीसदन (टाऊन हॉल) येथे महापारेषण कंपनीच्या राज्यभरातील अधिकारी व कर्मचारी वर्गाने या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत विविध विषयांवर आठ नाटके सादर केली. या स्पर्धेचे बक्षीस वितरण महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) अनिल कोलप, कार्यकारी संचालक (राज्य भार प्रेषण केंद्र) श्रीकांत जलतारे, मुख्य महाव्यवस्थापक (मा. सं.) सुधीर वानखेडे, अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता जयंत विके, कराड परिमंडलाच्या मुख्य अभियंता शिल्पा कुंभार, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सतिश अणे, औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता रंगनाथ चव्हाण, मुख्य अभियंता (स्थापत्य) भूषण बल्लाळ, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी तथा मुख्य समन्वयक भरत पाटील, नाट्यसचिव चिदाप्पा कोळी उपस्थित होते.

यावेळी दिनेश वाघमारे म्हणाले की, ''स्पर्धेत समाजप्रबोधन, चुकीच्या चालीरिती, पर्यावरण अशा विविध विषयांची मांडणी करणारी नाटके होती. त्यामुळे या सर्वच नाटकातील कलाकारांचे मी अभिनंदन करतो. तसेच ज्यांना पारितोषिक मिळाले,



त्यांनी याहीपेक्षा सुंदर काम करण्यासाठी प्रयत्न करावेत तर ज्यांना पारितोषिक मिळाले नाही, त्यांनी खचून न जाता पुढील वर्षी जोरात तयारी करून आपली कला सादर करावी. महापारेषणचे अधिकारी व कर्मचारी २४X३ काम करतात. कोविड काळात कर्मचाऱ्यांनी अखंड वीजपुरवठा केला. विशेषतः रूग्णालये व अत्यावश्यक सेवेचा वीजपुरवठा कायम सुरळीत ठेवला. तौक्ते व निसर्ग चक्रीवादळातही कर्मचाऱ्यांनी रात्रंदिवस काम केले.

महापारेषणने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला असून ड्रोनचा वापर, मंकी पेट्रोलिंग, उपकेंद्राचा रिमोट कंट्रोलने वापर, ऑप्टीकल वायरचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे महापारेषणला विविध पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे.''

या स्पर्धेमध्ये उत्तेजनार्थ म्हणून योगिनी कुलकर्णी (स्पर्श), नुरी पाल (भू-भू), चेतन तांबोळी (तीस तेरा), प्रताप भोसले (लाली), सुशील काळे (जननी जन्मभूमी), अरुंधती जगताप (वैशाली कॉटेज), शशिकांत इंगळे (दीपज्योती), सुशील घाडगे (द आऊट बर्स्ट) म्हणून गौरविण्यात आले. बालकलाकार म्हणून रुद्राक्ष खैरे व भार्गव जोशी, सांघिक कार्यालय, मुंबई व शर्वरी, नागपूर परिमंडल यांना गौरविण्यात आले.

रंगभूषा/वेषभूषा पुरस्कारासाठी जननी जन्मभूमीने प्रथम तर तीस तेरा नाटकाने व्दितीय क्रमांक पटकाविला. संगीत पुरस्कारासाठी 'द आऊट बर्स्ट'ने प्रथम तर भू-भू नाटकाने व्दितीय क्रमांक पटकाविला. प्रकाश योजनेसाठी प्रथम पुरस्कारात 'द आऊट बर्स्ट'ने तर व्दितीय स्पर्श नाटकाने बाजी मारली.

नेपथ्यसाठी दीपज्योती नाटकाने प्रथम तर स्पर्श नाटकाने व्दितीय क्रमांक मिळविला. अभिनय (पुरुष)साठी भू-भू नाटकासाठी मंगेश कुलकर्णीने प्रथम तर 'द आऊट बर्स्ट'च्या मधुर बोरकरने व्दितीय क्रमांक पटकाविला. अभिनय (स्त्री) साठी भू-भू नाटकातील हर्षदा वाघमारेने प्रथम तर वैशाली कॉटेज नाटकासाठी स्नेहल दरवडेने व्दितीय क्रमांक पटकाविला. उत्कृष्ट दिग्दर्शकासाठी प्रथम क्रमांक वाशीच्या भू-भू नाटकाने पटकाविला तर सांघिक कार्यालयाच्या द आऊट बर्स्ट नाटकाने व्दितीय क्रमांक पटकाविला. निर्मिती/ नाटकासाठी वाशी परिमंडलाच्या भू-भू नाटकाने प्रथम तर सांघिक कार्यालय, मुंबईच्या 'द आऊट बर्स्ट'ने व्दितीय पुरस्कार मिळविला.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून मुकुंद पटवर्धन, माधुरी दातार व नरेंद्र आमले यांनी काम पाहिले. यावेळी सांघिक कार्यालय, मुंबईतून महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मा. सं. आस्थापना) मंगेश शिंदे, राजशिष्टाचार अधिकारी सतीश जाधव उपस्थित होते.

# शुक्रवारच्या सोलापूर बंदमध्ये रिक्षाचालक, व्यापारी, कामगार, संघटनांचा सहभाग

## शाळा, महाविद्यालय यांचाही बंदमध्ये सहभाग राहणार, अत्यावश्यक सेवा चालू

सुराज्य/सोलापूर



हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल सत्तेतील मंडळींकडून वारंवार होत असलेल्या अवमानकारक वक्तव्याच्या निषेधार्थ येत्या शुक्रवार १६ डिसेंबरला सर्वपक्षीयांच्यावतीने सोलापूर शहर बंदची घोषणा करण्यात आली आहे. या बंदमध्ये व्यापारी संघटना, रिक्षाचालक, यंत्रमाग व विडी कामगार तसेच शाळा, महाविद्यालयांचाही सहभाग राहणार असल्याची माहिती श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली.

केवळ छत्रपती शिवरायच नव्हे तर सर्वच महापुरुषांचा सन्मान महाराष्ट्रात व देशात राखला गेला पाहिजे. राज्यकर्त्यांनी हे पथ्य अधिक पाळले पाहिजे पण राज्य सरकारमधील काही मंत्री, खुद्द राज्यपाल काहीही बरळत आहेत. त्यामुळे माफी मागून प्रश्न संपणार नाही. समाजातील लोकांच्या भावना दुखावण्याचे सत्र गेल्या काही दिवसापासून सुरुच आहे. त्यामुळेच बंदची हाक देण्यात आली असून यासाठी श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाने पुढाकार घेतला असल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष पद्माकर काळे, पुरूषोत्तम बरडे , राजन जाधव व उत्सव अध्यक्ष शेखर फंड यांनी दिली.

या बंदमधून रुग्णसेवा, औषधे, भाजीपाला, दूध या अत्यावश्यक सेवांना वगळण्यात आले आहे. सर्वच राजकीय पक्षांचा या बंदला पाठिंबा असल्याचे यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे यांनी सांगितले. गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील घटनात्मक जबाबदारी असलेले राज्यपाल व मंत्री महापुरूषांविषयी अवमानकारक वक्तव्ये करत आहेत. सातत्याने होणाऱ्या अशा बेताल वक्तव्यांमुळे राज्यातील जनता अस्वस्थ आहे. वेगवेगळे पक्ष, संघटना अशा प्रवृत्तीविरुद्ध आंदोलने करीत आहेत. महाराष्ट्रातील शिवद्रोही राज्यपालाची पदावरून हकालपट्टी व्हावी अशी राज्यातील जनतेची एकमुखी मागणी आहे. कोट्यावधी जनतेच्या या मागणीकडे सरकार जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याची भावना बळावत चालली असल्याचे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष भारत जाधव यांनी सांगितले. या बंदच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अवमानकारक वक्तव्ये करणारे भाजपचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी, मंत्री मंगलप्रसाद लोढा, केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आमदार प्रसाद लाड तसेच महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल चुकीचे वक्तव्य करणारे मंत्री चंद्रकांत पाटील यांचादेखील निषेध केला जाणार आहे. दरम्यान, या बंदला सर्व पक्ष, विविध शिवप्रेमी, भीमप्रेमी अनुयायी व सामाजिक संघटनांचा देखील सक्रिय पाठिंबा असल्याचे परिवहन समितीचे माजी सभापती राजन जाधव यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, संजय हेमगड्डी, विनोद भोसले, प्रताप चव्हाण, विजय पुकाळे, श्रीकांत डांगे, शिवाजी वाघमोडे, सोमनाथ राऊत, अप्पासाहे रोडगे, ॲड.एम.एच.शेख, सुशील बंदपट्टे, सुहास शिंदे, कांत उघडे, दत्ता मस्के, सोहम लोंढे, उमेश काळे, जमीर शेख, अजित कुलकर्णी, राजू हुंडेकरी आदी विविध संस्था व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

■ **महाराष्ट्रद्रोहाच्या कायद्याची मागणी करणार :** महापुरूषांविषयी व महाराष्ट्राविषयी कुणी काही वेडेवाकडे व बेताल वक्तव्य करीत असेल तर अशांना महाराष्ट्रद्रोही ठरविण्यासाठी स्वतंत्र कायद्याची मागणी येत्या विधानसभा अधिवेशनात करावी, यासाठी सर्व २८८ आमदारांना पत्रे पाठवून दिली जाणार असल्याचे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे यांनी सांगितले.

■ **सोलापूर बंद यशस्वी करा :** महापुरूषांविषयी बेताल वक्तव्ये करून त्यांचा अवमान केल्याप्रकरणी राज्यपाल भगतसिंह कोशारी यांची हकालपट्टी करा तर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करीत कामगार नेते, माजी आमदार नरसय्या आडम मास्तर यांनी शुक्रवारच्या सोलापूर बंदमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन हा बंद यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. सोमवारी माकपच्या दत्त नगर येथील कार्यालयात सोलापूर बंदच्या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत आडम मास्तर बोलत होते. यावेळी ॲड.एम.एच.शेख, ॲड.अनिल वासम, माजी नगरसेविका कामिनी आडम, सिद्धप्पा कलशेट्टी, म.युसूफ शेख मेजर, शेवंता देशमुख उपस्थित होते.

---

## टेम्पोतून लोखंडी साहित्य पळविले

**सोलापूर** : सारोळे (ता.मोहोळ येथील अवताडे यांच्या प्लांट मधून चोरट्यांनी छोटा हत्ती या वाहनातून ९८ हजाराचे लोखंडी साहित्य चोरून नेले. ही घटना रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात मोहोळच्या पोलिसांनी अनोळखी चोरट्या विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात अक्षय संजय आठवले (रा. सिद्धार्थ नगर, मोहोळ) यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली. सारोळे येथील गावात अवताडे कंपनीचा प्लांट असून त्या ठिकाणी बांधकामाचे साहित्य ठेवण्यात आले आहे. रात्रीच्या सुमारास अनोळखी चोरट्यांनी पांढऱ्या रंगाच्या टेम्पो आणून त्यात ६९ नग स्टीलच्या प्लेटा आणि लोखंडे साहित्य असा माल चोरून मोहोळच्या दिशेने पसार झाले. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार घोळवे पोलीस तपास करीत आहे.

## घरासमोरून चोरट्याने बुलेट पळवली

**सोलापूर** : अज्ञात चोरट्याने घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एम.एच.१३.बीझेड.१००० हि विश्वकरण पार्क राजा गणपती जुळे सोलापूर येथून चोरून नेली आहे.ही घटना दि.१० ते ११ डिसेंबर दरम्यान घडली. याप्रकरणी सुरेश लक्ष्मण ताकमोगे (वय-५६,रा.विश्वकरण पार्क,राजा गणपती जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोह.कांबळे हे करीत आहेत.

## फोनवर बोलताना मोबाईल पळवला

**सोलापूर** : फोनवर बोलत पायी चालत जात असताना पाठीमागून येणाऱ्या दुचाकीवरील इसमांनी एका तरुणाचा मोबाईल हिसकावून चोरून नेल्याची घटना दि. २ डिसेंबर रोजी रात्री साडेनऊ ते दहा वाजण्याच्या दरम्यान रामलाल चौक मुरारजी पेठ येथे घडली. याप्रकरणी ऋषभ महावीर सुराणा (वय-१९,रा.उमा नगरी,जुनी मिल कंपाऊंड) याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून दोन अज्ञात इसमानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल डोके हे करीत आहेत.

## मंत्र्यांच्या गाड्यासमोर जोरदार घोषणाबाजी; एकावर गुन्हा

**सोलापूर** : गुरव समाजाचा राज्यव्यापी महाअधिवेशन कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गाडीसमोर अतिश मोहन बनसोडे (वय-३२,रा. मिलिंद नगर बुधवार पेठ) याने घोषणाबाजी केली. त्याच्याविरूद्ध सार्वजनिक ठिकाणी शांतता भंग करून मान्यवरांच्या व स्वतः च्या जीवितास धोका निर्माण होईल असे कृत्य केले आहे, अशा आशयाची फिर्याद पोह.अंकुश महादेव भोसले (नेमणूक-गुन्हे शाखा,सोलापूर शहर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख हे करीत आहेत.

## सोलापूरकरांना चाहूल गड्डा यात्रेची; होम मैदानावर स्वच्छता

सुराज्य/सोलापूर



तब्बल ८०० वर्षांची परंपरा असलेल्या सोलापूरच्या गड्डा यात्रेची चाहूल सोलापूरकरांना लागत आहे. ऐतिहासीक होम मैदानावर स्वच्छतेच्या कामास सुरुवात झाली आहे.

ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांची गड्डा यात्रा हा सोलापूरसह महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश राज्यातील भाविकांसाठी जिव्हाळ्याचा विषय आहे. यंदाचीही यात्रा जानेवारी महिन्यात होणार आहे. गत दोन वर्ष कोरोनाच्या महामारीमुळे यात्रा पूर्ण संख्येने होऊ शकली नव्हती. यंदा श्री सिध्दरामेश्वर यात्रा मोठ्या संख्येने होणार असल्याने भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. गड्डा यात्रेत होम मैदानावर पाळणे, खाद्य पदार्थांची दुकाने, खेळण्यांची दुकाने, कपड्यांची दुकाने तसेच गृहपयोगी वस्तूंची दुकाने थाटली जातात. यात्रेत लाखो भाविक होम मैदानावर फेरफटका मारतात. तसेच या मैदानावर दरवर्षीप्रमाणे महाराष्ट्र शासन कृषी विभाग, आत्मा सोलापूर आणि जिल्हा परिषद सोलापूर यांच्यातर्फे ५२ वे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन २९ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान भरविण्यात येणार आहे.

सोलापूरकरकर गड्डा यात्रा सुरु होण्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. त्यासाठी होम मैदानाची स्वच्छता करण्यात येत आहे. ज्या मार्गावरून नंदीध्वज येणार आहेत तो मार्ग स्वच्छ करण्यात येत आहे. काटेरी झुडपे काढणे, दगड उचलणे, गवत काढणे अशीही कामे सुरु आहेत.

## संभाजी ब्रिगेडचे आंदोलन

**सोलापूर** : चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक झाल्यानंतर आठ पोलीस कर्माचारी तर तीन पोलिस अधिकाऱ्यांवर निंलबनाची कारवाई करण्यात आली. ही कारवाई रद्द करण्यात यावी म्हणून संभाजी ब्रिगेड च्या वतीने धरणे आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. याप्रकरणी कोणत्याही पोलिसांवर कारवाई करु नका, अशी विनंती चंद्रकांत पाटील यांनी करून देखील पोलिसांचे निलंबन करण्यात आलं आहे, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी शहराध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, जिल्हा सचिव राजेंद्र माने, दत्ता जाधव, बबन डिंगणे, मुस्तफा शेख, महेश सरोदे, मंजुनाथ पारुते आदी उपस्थित होते



## दहिगाव आवर्तन सुरू करण्याची शिफारस कालवा सल्लागार समितीकडे करणार : आ.शिंदे

**सोलापूर** : करमाळा तालुक्याच्या पूर्व भागाला वरदान ठरलेल्या दहिगाव उपसा सिंचन योजनेची आढावा बैठक आ. संजयमामा शिंदे यांचे अध्यक्षतेखाली म्हैसगाव येथे संपन्न झाली. ५ जानेवारी २०२३ पासून दहिगाव उपसा सिंचन योजनेचे व १५ डिसेंबर पासून सीना माढा बोगद्याचे आवर्तन सुरू करावे अशी शिफारस आपण कालवा सल्लागार समितीकडे करणार असल्याची माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

या बैठकीला जलविद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता किं.वा. चौकडे, उपअभियंता पी.पी. घारे, शाखाअभियंता शा.अ.तरंगे, मेकॅनिकल विभागाचे उपअभियंता सं.प्र.पाटील, आ.बा.गोरे, स्थापत्य विभागाचे उपअभियंता एस. के. अवताडे, डॉ. विकास वीर, प्रणित शिंदे उपस्थित होते. बैठकीमध्ये दहीगाव उपसा सिंचन योजना टप्पा १ व टप्पा २ आवर्तन सुरू करण्याच्या दृष्टीने येणाऱ्या अडचणी व चर्चा करण्यात आली. ३१ डिसेंबर २०२२ पूर्वी टप्पा १ व टप्पा २ येथील जलविद्युत, यांत्रिकी व स्थापत्य विभागाने आपली सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत. ५ जानेवारी पूर्वी पंपांची ट्रायल घेण्यात यावी. ५ जानेवारी २०२३ पासून दहिगाव उपसा सिंचन योजनेचे व १५ डिसेंबर पासून सीना माढा बोगद्याचे आवर्तन सुरू करावे अशी शिफारस आपण कालवा सल्लागार समितीकडे करणार असल्याची माहिती आ.शिंदे यांनी यावेळी दिली. दहीगाव उपसा सिंचन योजनेचे सर्व पंप १०० टक्के क्षमतेने कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने काम वेळेत पूर्ण करावे. टप्पा १ व टप्पा २ याठिकाणी कॅनॉल वरती असलेले सायफण काढून टाकावेत. टेल ला पूर्ण क्षमतेने पाणी कसे जाईल याचे नियोजन करावे अशा सूचना शिंदे यांनी यावेळी दिल्या.

### पोटेगाव बंधारा दुरुस्ती काम मे अखेर पूर्ण करण्याचे नियोजन

करमाळा तालुक्यातील सीना नदीवरील पोटेगाव हा महत्त्वाचा बंधारा आहे. या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी महाराष्ट्र शासनाच्या विस्तार सुधार या योजनेमधून ४ कोटी १५ लाख रुपये निधीचे अंदाजपत्रक तयार केलेले असून सदर बंधारे ची बंधाऱ्याची दुरुस्ती मे २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन असून जूनच्या पावसाळ्यामध्ये सदर बंधाऱ्यात १०० टक्के पाणी साठवण्याची क्षमता असेल, अशी माहिती आ.संजयमामा शिंदे यांनी दिली.

## हैद्राबाद येथील महोत्सवात 'कळा ज्या लागल्या जीवा' ची निवड

**सोलापूर** : हैदराबाद येथे होत असलेल्या बहुभाषिक फेस्टिवलमध्ये सोलापूरच्या नक्षत्र थिएटर्सचं कळा ज्या लागल्या जीवा हे नाटक सादर होणार आहे अशी माहिती आज नक्षत्र थिएटरचे अध्यक्ष सुमित फुलमामडी यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रा.अनिल सोनार लिखित सुमित फुलमामडी, राजेश जाधव दिग्दर्शित या मराठी नाटकाचे हैद्राबाद येथे होणाऱ्या १२ ते १७ डिसेंबर पर्यंत चालणाऱ्या महोत्सवात १३ डिसेंबर रोजी सोलापूर येथील नक्षत्र थिएटरसच्या कळा ज्या लागल्या जीवा या मराठी नाटकाचे रविंद्रभारती थिएटर येथे सादरीकरण होणार आहे. यामध्ये प्रमुख भूमिका अशोक किल्लेचार, मिलिंद पटवर्धन, अपर्णा जोशी, विजया कोकणे, सुनंदा शेंडगे, किरण फडके, शिवप्रसाद चिक्का, राजू रंगम यांची राहणार आहे. तर प्रकाश योजना- जे.पी. कुलकर्णी, संगीत- साईनाथ ताटे, नेपथ्य- श्रावण ढावरे, सय्यद इक्बाल, सुत्रधार- हिरालाल धुळम व मिलिंद म्हेत्रे हे आहेत. या पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष मिलिंद पटवर्धन, सचिव अशोक किल्लेदार, सुनंदा शेंडगे, किरण फडके, राजू रंगम आदी उपस्थित होते.

## सेवालाल महाराजांच्या पूर्णाकृती मूर्तीचे मोफत वितरण

**सोलापूर** : येथील आई प्रतिष्ठानच्या वतीने बंजारा समाजाचे संत सेवालाल महाराज यांचे समाजोपयोगी विचार आणि शिकवण सर्वदूर पोहचावी या हेतूने संत सेवालाल महाराजांच्या १०१ पुर्णाकृती मुर्तीचे मोफत वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष प्रकाश राठोड यांनी पत्रकार परिषदेत दिली. भारतामध्ये १२ कोटीपेक्षा जास्त समुदाय असलेल्या आणि स्वतंत्र भारताच्या इतिहासात महत्वपूर्ण योगदान असलेल्या बंजारा समाजाच्या संत सेवालाल महाराजांची दि. १५ फेब्रुवारी २०२३ रोजी २८४ वी जयंती साजरी केली जाणार आहे. ज्या समाजबांधवांना आपल्या परिसरात किंवा तांड्यामध्ये संत सेवालाल महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करावयाची आहे त्यांनी आई प्रतिष्ठान संस्थेशी संपर्क साधावा असे आवाहन आई प्रतिष्ठान संस्थेकडून करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. लालसिंग रजपूत, अश्विनी राठोड, युवराज चव्हाण, तानाजी राठोड,अशोक जाधव, रवींद्र चव्हाण आदी उपस्थित होते.

## सुंदरम नगर येथील जलतरण सुरू करण्याची मागणी

**सोलापूर** : विजापूर रोडवरील सुंदरम नगर येथे महानगरपालिकेच्या मालकीचा जलतरण तलाव असून कोव्हिड काळापासून संबंधित तलाव बंद आहे. हा जलतरण सुरू करण्याची मागणी माजी आ. शिवशरण पाटील यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे. विजापूर रोड परिसरातील लोकसंख्या पाहता हा जलतरण तलाव सुरू होणे गरजेचे आहे. हा तलाव बंद असल्याने अनेकजण अशोक चौक येथील जलतरण तलावात पोहण्याचा सराव करण्यास जातात. त्यामुळे अनेकांचा वेळ जात आहे. सोलापूर शहरातून याआधी अनेक नामवंत जलतरण पटटू तयार झाले आहेत. त्यामुळे सुंदरम नगर येथील जलतरण तलाव तात्काळ सुरू करावा, असे शिवशरण पाटील यांनी म्हटले आहे.

## जनावरांची वाहतूक करणाऱ्या चालकास मारहाण करून लुटले; गुन्हा दाखल

**सोलापूर** : टेम्पोतून जनावरांची वाहतूक करणाऱ्या चालकास मारहाण करून त्याच्या खिशातील रोकड लुटून आणखी पैशाची मागणी केल्याची घटना आडेगाव येथे घडली. या प्रकरणात टेंभुर्णीच्या पोलिसांनी चौघांविरुद्ध खंडणी आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. सूरज शिंदे, समाधान कांबळे, दादा लोंढे आणि लोंढे (सर्व रा.माळेगावा) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.



मुलाने हा शनिवारी रात्रीच्या सुमारास आपल्या एमएच-१३सीयु-१०५७ या आयशर टेम्पोतून जनावरांची वाहतूक करीत होता. रात्री ९ वाजेच्या सुमारास आडेगाव येथील वडवली चौकात सुरज शिंदे याच्यासह चौघांनी त्यांचा टेम्पो अडवला. आणि पैशाची मागणी केली. त्यानंतर त्याच्या खिशातून ४ हजार ५०० रुपये बळजबरीने काढून घेतले. ४० हजार रुपये दे, असे म्हणत त्याचे वाहन अडवून ठेवले. अशा आशयाची फिर्याद ड्रायव्हरने पोलिसात दाखल केली. पुढील तपास हवालदार शिंदे करीत आहेत.

## सोलापूर महापालिकेतील जनता दरबारात तब्बल ६३ तक्रारी दाखल



### आयुक्तांनी जाणून घेतल्या समस्या आणि दिले कार्यवाहीचे आदेश

**सोलापूर** : महापालिकेतील सोमवारच्या जनता दरबारात तब्बल ६३ नागरिकांनी तक्रारी दाखल केल्या. मोठी गर्दी असल्याने उशिरापर्यंत हा दरबार सुरू होता. यावेळी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी नागरिकांचे प्रश्न व समस्या ऐकून घेऊन संबंधित विभागास कार्यवाहीचे आदेश दिले.

नव्या आयुक्तांच्या कार्यतत्परतेमुळे अपेक्षा वाढल्याने यंदाच्या प्रशासकीय राजवटीत आलेल्या या सर्वाधिक तक्रारी असल्याचे बोलले जात आहे. महापालिकेत नागरिकांच्या समस्या तक्रारी प्रश्न मांडण्यासाठी दर सोमवारी जनता दरबार घेतला जातो. महापालिकेच्या नव्या आयुक्त शितल तेली - उगले यांनी जनता दरबाराची वेळ बदलून दर सोमवारी दुपारी ३.३० ते सायंकाळी ५.३० अशी केली आहे. वेळेत बदल केल्यानंतरच्या आजच्या पहिल्या सोमवारी महापालिकेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात आयोजित या जनता दरबारामध्ये दुपारी तीन वाजल्यापासूनच नागरिकांनी टोकन घेण्यास सुरुवात केली. सायंकाळी ६ वाजेपर्यंत एकूण ६३ नागरिकांनी टोकन घेतले होते. जनता दरबारात समस्या मांडण्यासाठी नागरिक, संस्था व संघटना पदाधिकाऱ्यांची गर्दी झाली होती. यापूर्वीच्या जनता दरबारात दाखल केलेल्या तक्रारींचे निवारण न झाल्याने काही नागरिक पुन्हा स्मरणपत्र देण्यासाठी आल्याचे दिसून आले.

**नागरिकांची वाढली गर्दी**

मार्च २०२२ पासून महापालिकेत प्रशासकीय राजवट लागू आहे. ८ महिन्याच्या प्रशासकीय काळात सोमवारी जनता दरबारात सर्वाधिक तक्रारी दाखल झाल्या असल्याचे बोलले जात आहे. नव्या आयुक्तांच्या कार्यतत्परतेमुळे प्रश्न, समस्या सुटण्याची नागरिकांची अपेक्षा वाढल्याने जनता दरबारात गर्दी वाढली आहे, अशी चर्चा आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अथवा रस्त्यावर कचरा टाकल्यास होणार दंडात्मक कारवाई!

सुराज्य/सोलापूर



शहरात सार्वजनिक ठिकाणी अथवा दुकानासमोर रस्त्यावर कचरा टाकल्याचे आढळून आल्यास नियमानुसार थेट दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या संदर्भात महापालिकेचे उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी कचरा व्यवस्थापन विभागास सक्त आदेश दिले आहेत.

सोलापूर शहरात सार्वजनिक ठिकाणी त्याचबरोबर रस्त्यांवर मधोमध कचरा टाकला जात असल्याचे प्रकार निदर्शनास येत आहेत. बाजारपेठांमध्ये काही दुकानदार झाडून कचरा रस्त्याच्या मधोमध लावतात. यामुळे अस्वच्छता दिसून येते. महापालिकेचे कर्मचारी भल्या सकाळी सार्वजनिक ठिकाणी व रस्त्याची झाडलोट करून साफसफाई करतात. मात्र काहीजण सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकत असल्याचे दिसून येते. नवी पेठ परिसरासह काही बाजारपेठांमध्ये दुकानासमोरील झाडलोट करून काही दुकानदार झाडलोट करून तो कचरा रस्त्यावर आणून ठेवतात, ही गंभीर बाब आहे. सर्वांनी शहर स्वच्छतेसाठी योगदान देणे गरजेचे आहे. त्यासाठी आता सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यास त्याचबरोबर रस्त्यावरही कचरा दिसून आल्यास त्या परिसरातील दुकानदारांवर व नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

या संदर्भात उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी कचरा व्यवस्थापन विभागाचे मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांना तसे आदेश दिले आहेत. त्या विभागातील आरोग्य निरीक्षकांनी त्या परिसरात कचरा आढळून आणल्यास संबंधित नागरिक व दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

### कचऱ्याचे वर्गीकरण करा : घोलप



आता सार्वजनिक ठिकाणी अथवा रस्त्यावर कचरा टाकल्यास महापालिका प्रशासनाकडून दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तेव्हा नागरिक व दुकानदारांनी ओला व सुका कचरा वेगळा करून घंटागाडीमध्ये द्यावा. सार्वजनिक ठिकाणी अथवा रस्त्यावर कचरा टाकल्याचे दिसून आल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे आवाहन महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी केले आहे.